बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड

# पुण्यभूमी

संपादकःबाळासाहेब मस्के

बीड | बुधवार,दि.१६ एप्रिल २०२५ |वर्षे४थे| अंक२४४वा|पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब भगवानराव मस्के

# थापा मारुनच सत्तेत आले, लाडक्या बहिणी संतापल्या

लाडक्या बहिणींचे भाऊ भलतेच चालू ◆ लाडक्या बहिणींना फक्त ५०० चा हफ्ता! ◆ राज्य सरकारने स्पष्ट केली भूमिका ◆ विविध कारणे सांगून बहिणींना वगळू लागले



पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबई: मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी ठरलेल्या राज्यातील तब्बल ८ लाख महिलांना आता १५०० रुपयांऐवजी दर महिन्याला केवळ ५०० रुपयांचा हफ्ता मिळणार असल्याची माहिती समोर आली आहे. या ८ लाख महिलांना नमो शेतकरी महासन्मान निधी मिळत असल्याने त्यांना १५०० रुपयांऐवजी केवळ ५०० रुपये मिळणार आहेत. राज्य सरकारने केलेल्या छाननीत ८ लाख लाडक्या बहिणींना नमो शेतकरी महासन्मान निधीची मदत मिळत असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे १ हजार रुपयांची कपात करण्यात येणार आहे. मे महिन्यापासूनच या हप्त्यात कपात होणार आहे.

दरम्यान, यावर राज्यातील ८ लाख महिलांना नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेअंतर्गत १००० रुपये मिळत असल्याने त्यांना मिळणारा मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा १५०० रुपयांचा मासिक हप्ता कमी करून फक्त ५०० रुपये देण्याचा राज्य सरकारचा निर्णय अन्यायकारक नाही का, असा सवाल राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने केला आहे. निवडणुकीपूर्वी २१०० रुपयांचा हप्ता देऊ, अशी वल्गना करणारे महायुती सरकार आज २१०० रुपये तर सोडाच, पण मासिक १५०० रुपयेही वेळेवर देत नाही. याउलट ते अजून कसे कमी होतील, यासाठी नवनव्या क्लृप्त्या शोधत आहे. महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींची ही घोर फसवणूक असल्याचे ट्वीटमध्ये म्हटले आहे.

नमो शेतकरी योजना आणि लाडकी बहीण योजना अशा दोन्ही योजनांचा लाभ घेणा-या ८ लाख महिलांना लाडकी बहीण योजनेचे ५०० रुपयेच मिळणार असल्याचे सांगितले जात आहे. यामुळे महिलांनी नाराजी व्यक्त केली आहे. आर्थिक सक्षम पान २ वर



### म्हणून महिलांना ५०० रुपयांची मदत

इतर शासकीय योजनांचा १५०० रुपयांपेक्षा कमी लाभ घेणा-या महिलांना उर्वरित फरकाची रक्कम सन्मान निधी म्हणून वितरित करण्यात येत आहे. त्याच शासन निर्णयाला अनुसरून नमो शेतकरी सन्मान योजनेचा दरमहा १००० रुपये लाभ घेत असलेल्या ७,७४,१४८ महिलांना उर्वरित फरकाचे ५०० रुपये सन्मान निधी वितरित करण्यात येत आहे, असे स्पष्टीकरण मंत्री आदिती तटकरे यांनी दिले.

### लाडक्या बहिणींच्या संख्येत दरमहा घट!

ऑक्टोबरमध्ये या योजनेसाठी २.६३ कोटी अर्ज आले होते. तपासणी प्रक्रियेनंतर ही संख्या ११ लाखांनी कमी झाली. त्यामुळे फेब्रुवारीपर्यंत २.५२ कोटी महिला लाभार्थ्यांना योजनेचे पैसे मिळाले. फेब्रुवारी आणि मार्चमध्ये ही संख्या २.४६ लाखावर आली. यातूनही आता नमो शेतकरी योजनेचा लाभ घेणा-यांना १५०० रुपयाऐवजी फक्त १ हजार रुपये मिळणार आहेत.

### आधी सरसकट लाभ, आता निकष लावले

विधानसभा निवडणुकीआधी लाडकी बहीण योजना सुरु झाली तेव्हा महिलांना सरसकट लाभ देण्यात आला. यात पात्र, अपात्र अशा दोन्ही प्रकारच्या महिलांनी अर्ज केले. पण विधानसभा निवडणुकीनंतर राज्य सरकारने लाडकी बहीण योजनेअंतर्गत लाभ मिळणा-या महिलांची कागदपत्र पडताळणी केली. यातून अपात्र ठरलेल्या महिलांना योजनेच्या लाभातून वगळले.

# भाजपा कार्यकर्त्याची निर्घृण हत्या

खळबळ:आरोपी स्वतः गेला पोलिसांना शरण



पुण्यभूमी प्रतिनिधी



नारायण फपाळ,आरोपी



मयत बाबासाहेब आगे

बीड:सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर संपूर्ण राज्यात चर्चा झालेल्या बीडमधील गुन्हेगारीचा आलेख दिवसेंदिवस उंचावत चालला आहे. माजलगाव येथे भाजपा कार्यकर्त्याची भर दुपारी निर्घृण हत्या करण्यात आली आहे. धारदार शस्त्रानं सपासप वार करत तरुणाला जागेवरच संपवण्यात आलं आहे. या घटनेमुळे बीडमध्ये कमालीची भीती निर्माण झाली आहे.माजलगाव शहर पोलिसांनी मारेकऱ्याला ताब्यात घेतल्याची माहिती पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांनी दिली आहे. मात्र, या घटनेमुळे बीडमधील कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न उपस्थित झाला आहे.माजलगाव शहरातील स्वामी समर्थ मंदिराच्या पाठीमागे असलेल्या भाजपा कार्यालयासमोर मंगळवारी (१५ एप्रिल) भरदिवसा तरुणाची हत्या करण्यात आली. बाबासाहेब प्रभाकर आगे (रा. किट्टी आडगाव) असे भाजपा कार्यकर्त्याचं नाव आहे. आरोपी नारायण शंकर फपाळ यानं ही हत्या पान २ वर

### आरोपी स्वत:हून पोलिसांना शरण

मिळालेल्या माहितीनुसार आरोपीच्या पत्नीसोबत बाबासाहेब आगे याचे अनैतिक संबंध होते. वेळोवेळी सांगून आणि समज देऊनही आगे ऐकत नसल्यानं आरोपी दोन महिन्यापासून त्याच्या मागावर होता. दरम्यान मंगळवारी आरोपी नारायण फपाळ आणि बाबासाहेब आगे समोरासमोर आले. नारायण यानं कोयत्यानं बाबासाहेबवर सपासप वार करत जागेवरच संपवले. यानंतर आरोपी हा स्वतः पोलीस स्टेशनला हजर झाला आहे.

# लातुरचे आयुक्त धोक्यातून बाहेर घेतायेत स्वत:श्वास!

चर्चेतले:डोक्यात गोळी झाडून केला होता आत्महत्याचा प्रयत्न

पुण्यभूमी प्रतिनिधी



लातूर:येथील महापालिकेचे आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी दि. ५ शनिवार रोजी रात्री उशिरा स्वत:च्या डोक्यात गोळी झाडून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता. या दुर्देवी घटनेमुळे काही क्षणांसाठी का होईना लातूरकर थबकले होते. या घटनेला १० दिवसांहून अधिकाचा काळ उलटल. आता त्यांयावर मुंबईतील कोकीळाबेन हॉस्पीटलमध्ये उपचार सुरु असून ते उपचाराला लातूरच्या सह्याद्री रुग्णालया प्रमाणेच प्रतिसाद देत आहेत. त्यांना कृत्रीम श्वासोश्वास देणारे व्हेंटीलेटर काढण्यात आले असून आता ते स्वत: चांगल्याप्रकारे श्वासोश्वास घेत आहेत. ते स्वत: श्वासोश्वास घेत असल्याने व त्यांच्या प्रकृतीत वरचेवर सुधारणा होत आहे.

आयुक्त मनोहरे यांनी आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याच्या घटनेनंतर त्यांना तात्काळ लातूरातील सह्याद्री हॉस्पीटल येथे दाखल करण्यात आले होते येथे यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. मात्र मेंदूच्या काही भागात संवेदना कमी असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी मुंबई येथील कोकिळा बेन हॉस्पिटल येथे सोमवारी दि. ७ एप्रिल रोजी सकाळी साडेदहा ते अकराच्या दरम्यान एअर ॲम्बुलन्सद्वारे लातूर विमानतळावरून मुंबईकडे नेण्यात आले.

तेथे ही त्यांनी लातूर प्रमाणेच उपचाराला प्रतिसाद दिला असून त्याच्या मेंदूच्या पान २ वर

# आज जिल्हा गुंतवणूक परिषद

माहिती: उद्योगमंत्री उदय सामंत यांची उपस्थिती

पुण्यभूमी प्रतिनिधी



बीड: राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या अध्यक्षतेखाली उद्या जिल्हा गुंतवणूक परिषद होत आहे. ही परिषद येथील ग्रँड यशोदा हॉटेल, बार्शी नाका येथे सकाळी १०.०० वाजता याचे उद्घाटन होईल.

महाराष्ट्रातील जिल्हयांना सक्षम बनविणे आणि गुंतवणूक आकर्षित करण्यास चालना मिळावी यासाठी राज्यातील सर्व जिल्हयात उद्योग संचलनालय आणि जिल्हा उद्योग केंद्रामार्फत हा उपक्रम राबविण्यात येत आहे. पान २ वर

# सोमय्या विरोधात मुस्लिम समाज आक्रमक

निषेध:काळे झेंडे दाखवत केली घोषणाबाजी

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:भाजपाचे माजी खासदार किरीट सोमय्या हे मंगळवारी परळी दौऱ्यावर होते. परळीचा दौरा आटपून कारने जात असताना दुपारी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते एक मिनार चौक दरम्यान मुस्लिम समाजाच्या तरुणांनी घोषणाबाजी करीत सोमय्या यांना काळे झेंडे दाखवले.

विलंबित जन्म प्रमाणपत्र रद्द करून याप्रकरणी चौकशी करण्याची मागणी करत गुन्हे दाखल करावे यासाठी सोमय्या हे परळी शहर पोलीस ठाण्यात आले होते. पोलीस ठाणे मार्गे ते दुपारी बाराच्या दरम्यान गेवराईकडे जाण्यासाठी वाहनांमध्ये बसले असता छत्रपती शिवाजी चौक मार्गे जात असताना मुस्लिम तरुणांनी काळे झेंडे दाखवत त्यांच्या गाड्याजवळ घोषणाबाजी केली. पान २ वर




### बोगस जन्मप्रमाणपत्राची चौकशी करावी

बीड जिल्ह्यातील परळी, माजलगाव, गेवराई व बीड शहर येथे ज्यांच्याकडे जन्माचे कागदपत्र नव्हते, अशा नागरिकांना विलंबित पद्धतीने जन्म प्रमाणपत्रे देण्यात आल्याचे प्रकरण उघडकीस आले आहे. विलंबित जन्म प्रमाणपत्र देणे ही चिंतेची बाब आहे. जन्माचे कागदपत्र नसणे खोट्यासह्या, नोटरीचा पत्ता नाही, अशा अपात्र व्यक्तींना मोठ्या प्रमाणात जन्म प्रमाणपत्रे देण्यात आली आहेत. नायब तहसीलदारांना अधिकार नसतानाही जन्म प्रमाणपत्र देण्यात आले आहे. या बोगस जन्मप्रमाणपत्राची चौकशी करण्यात यावी. यामागील सूत्रधारांचा शोध घेण्यात यावा, अशी मागणी भाजप नेते व माजी खासदार किरीट सोमय्या यांनी केली आहे. तसेच महाराष्ट्रातील मूळ मुसलमान नागरिका विषयी काहीही अडचण नाही, असे ही सोमय्या म्हणाले आहेत.

प्रा.मुंडे

बोंबला:मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला निर्णय

# नगराध्यक्षांना हटविण्याचे अधिकार नगरसेवकांनाच!



पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबई : प्रतिनिधी राज्यातील नगर परिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरींच्या नगराध्यक्षांना पदावरून हटविण्याचे अधिकार आता नगरसेवकांना देण्याचा निर्णय मंगळवार दि. १५ एप्रिल रोजी झालेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. राज्यात सध्या कार्यरत असलेल्या १०५ नगर परिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरींसाठी हा निर्णय लागू असणार आहे. अध्यादेश काढून या निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करण्यात येणार आहे. अधिनियमातील सुधारणाविषयक विधेयक राज्य विधिमंडळाच्या आगामी पावसाळी अधिवेशनात मांडण्यात येईल. सरकारच्या या निर्णयामुळे अनेक वर्षे रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक दिवाळीनंतर होण्याचे संकेत मिळत आहेत.

राज्य मंत्रिमंडळाच्या आजच्या बैठकीत महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मध्ये सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली. या सुधारणेनुसार नगराध्यक्षांना पदावरून दूर अधिकार निवडून आलेल्या नगरसेवकांना असणार आहेत. निवडून आलेल्या नगरसेवकांच्या संख्येपैकी दोन तृतीयांश संख्येने नगरसेवकांच्या सह्यांचा प्रस्ताव जिल्हाधिका-यांना पान २ वर

### वसुलीसाठी अभय योजना

राज्यातील नगरपरिषदा, नगरपंचायती, औद्योगिक नगरी क्षेत्रातील थकीत मालमत्ता कर वसूलीकरीता दंड माफ करून वसूली वाढविण्यासाठी अभय योजना लागू करण्यास आज मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी क्षेत्रातील मालमत्तांच्या थकीत करांवर दरमहा दोन टक्के दंड लावण्याची तरतूद आहे. यामुळे मालमत्ता धारकाच्या एकूण थकबाकीमध्ये वाढ होऊन दंडाची ही रक्कम अनेकदा मूळ कराच्या रकमेपेक्षा अधिक होते. मूळ कराच्या रकमेपेक्षा दंडाची रक्कम अधिक झाल्याने मालमत्ताधारक कर भरण्यास टाळाटाळ करतात. यावर उपाय म्हणून थकीत मालमत्ता करावरील दंड माफ करून अभय योजना लागू करण्यात येणार आहे. यापुर्वीच्या अधिनियमात अशा दंड माफीची तरतूद नाही. तशी तरतूद अधिनियमात करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

# उड्डाण पूलावरील भिंत तुटली

चित्र:बांधकाम विभागाचा नेहमीचाच अक्षम्य दुर्लक्षपणा



पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी: शहरातील अत्यंत महत्वाचा असलेला रेल्वे उड्डाणपूलावरील पोलीस चौकीच्या बाजूला असलेली सुरक्षा भिंत काही वर्षांपूर्वी एका अपघातात तुटलेली आहे.परंतू सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नेहमीच्याच अक्षम्य दुर्लक्षपणामुळे कठड्याचे बांधकाम अद्याप करण्यात आलेले नाही.

उड्डाण पूलावर रहदारीच्या व्यवस्थेसाठी जी पोलीस चौकी उभारण्यात आली होती. ती सध्या बंद अवस्थेत आहे.या चौकीच्या बाजूला बस स्थानककाकडे जाणा-या उतारावर तीन ते चार वर्षीपूर्वी एका ट्रकने संरक्षीत भिंतीला जोराची धडक दिली होती.या पान २ वर

## भाजप म्हणजे कटकारस्थान

अहमदाबादमध्ये काँग्रेसचे ८४ वे अधिवेशन बुधवारी पार पडले. या दोन दिवसीय अधिवेशनात वैचारिक देवाण-घेवाण झाली. काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, भाजपा आणि आरएसएसवर सडकून टीका केली. आम्ही जाती आधारित जनगणना करण्याची मागणी केली पण पंतप्रधान मोदी यांनी ती मान्य केली नाही. आम्ही सत्तेत आल्यावर जाती आधारित जनगणनेचा कायदा मंजूर करू असे राहुल गांधी म्हणाले. महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक भाजपने कटकारस्थान रचून जिंकल्याचा आरोप राहुल गांधी यांनी केला. येणा-या काळात देशात बदल घडणार आहे. लोकांचे मत बदलत आहे, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. मला फक्त माझ्या कामात रस आहे, लोक काय म्हणतील याने मला काहीही फरक पडत नाही. तेलंगणात आम्ही क्रांतिकारी निर्णय घेतला.

तेथे आम्ही जातनिहाय जनगणना करीत आहोत. काही महिन्यांपूर्वी मी संसदेत एक भाषण केले होते. केंद्र सरकारने जातनिहाय जनगणना करावी, अशी मी मोदींकडे मागणी केली होती. या देशात दलित किती आहेत, मागास किती आहेत, मुस्लिम-आदिवासी किती आहेत हे समजले पाहिजे असे मी म्हणालो होतो. देशाचा 'एक्स-रे' काढला पाहिजे, अशी मागणी मी केली होती. पण मोदीजी, संघाने आम्ही जातनिहाय जनगणना करणार नाही असे स्पष्टपणे सांगितले. काँग्रेसच्या या अधिवेशनाला देशभरातून १७००हून अधिक काँग्रेसचे प्रतिनिधी उपस्थित होते. काँग्रेस प्रतिनिधींना संबोधित करताना राहुल गांधी म्हणाले, देश आता भाजपला कंटाळला आहे. बिहारच्या निवडणुकीत त्याचे प्रत्यंतर येईल. भाजपने महाराष्ट्रात निवडणूक कशी जिंकली ते तेथील लोकांना विचारा. महाराष्ट्रात ५० लाख मतदार अचानक कसे वाढू शकतात? महाराष्ट्रातील मतदारयाद्या आम्ही केंद्रीय निवडणूक आयोगाला मागितल्या होत्या पण त्या अजूनही मिळालेल्या नाहीत. ठोस विचार नसलेला राजकीय पक्ष संघासमोर उभा राहून वैचारिक लढा देऊ शकत नाही.

काँग्रेसकडे वैचारिक स्पष्टता आहे. संघाविरोधात फक्त काँग्रेस लढा देऊ शकतो. संविधानाच्या रक्षणासाठी संघ व भाजपविरोधात लढाई कायम राहील आणि हे काम काँग्रेसलाच करावे लागेल, त्यामुळे कार्यकर्त्यांनी या लढाईसाठी तयार राहिले पाहिजे असा सल्ला राहुल गांधी यांनी दिला. अधिवेशनाच्या समारोपाच्या सत्रात पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी संघ व भाजपविरोधात लढण्यासाठी विचार, आचार आणि प्रचाराची गरज आहे. काँग्रेसकडे विचार आणि आचार असून आता प्रचारावर जोर दिला पाहिजे. शिवाय पक्षाकडे मनुष्यबळ, मानसिक बळ व आर्थिक बळ असावे लागते. काँग्रेसकडे आर्थिक बळ कमी असले तरी मनुष्यबळ व मानसिक बळ आहे. त्यामुळे काँग्रेस संघ व भाजपविरोधात लढू शकतो असा विश्वास खरगे यांनी व्यक्त केला. संविधानाच्या रक्षणाचा मुद्दा स्पष्ट करताना राहुल गांधी यांनी वक्फ कायद्याला काँग्रेसचा विरोध असल्याचा पुनरुच्चार केला. नव्या वक्फ कायद्यामुळे धर्माच्या स्वातंत्र्यावर व संविधानावर हल्ला झाला आहे.

मुस्लिमानंतर ख्रिश्चनांच्या जमिनी काढून घेतल्या जातील असे संघ विचाराच्या नियतकालिकात म्हटले होते. शीख व इतर अल्पसंख्याकांच्या जमिनीही बळकावल्या जातील असा इशारा राहुल गांधींनी दिला. खरगे यांनीही वक्फच्या मुद्यावर काँग्रेसच्या पाठीशी असल्याचे सांगितले. केरळचे खासदार शशी थरूर यांनी फक्त भाजपचे टीकाकार होऊन चालणार नाही. त्याचा काँग्रेसला फायदा मिळण्याची शक्यता नाही. उलट सकारात्मक विचार करूनच पुढे गेले पाहिजे असा विचार मांडला. लोकसभेच्या सलग तीन निवडणुकांमध्ये आपण पराभूत झालो आहोत. आपल्याला मतांची टक्केवारी वाढवता आली नाही यावर गांभीर्याने विचार केला पाहिजे. राष्ट्रवादाचा मुद्दा आपण हिरिरीने मांडला पाहिजे असेही ते म्हणाले. काँग्रेसच्या ठरावामध्ये राष्ट्रवादाच्या मुद्याचा समावेश करण्यात आला आहे. जातींमध्ये व धर्मामध्ये तेढ निर्माण करणारा संघाचा राष्ट्रवाद मान्य नसून सर्वांना एकत्र घेऊन जाणारा राष्ट्रवाद काँग्रेसला अभिप्रेत असल्याचे ठरावात नमूद करण्यात आले आहे.

राष्ट्रवादाचा अर्थ प्रादेशिक अखंडता तर असतोच. यासोबत सामाजिक, राजकीय व आर्थिक सशक्तीकरणाचा देखील त्यामध्ये समावेश होतो. सर्व देशवासीयांना समान न्याय देणे, वंचित-पीडित-शोषितांच्या अधिकारांचे रक्षण करणे, सद्भावना व बंधुभावाच्या सूत्राने देश एकसंध ठेवणे आणि भारताचा बहुलतावादी व उदारमतवादी आचार, विचार व व्यवहार म्हणजे राष्ट्रवाद. काँग्रेसचा राष्ट्रवाद समाजाला जोडणारा आहे तर भाजपचा, संघाचा ढोंगी राष्ट्रवाद समाजाला तोडणारा, सत्तेसाठीचा संधिसाधू आहे. सत्ता मिळवण्यासाठी आणि ती टिकवण्यासाठी भाजप व संघ देशात धर्म, जात, भाषा, प्रांत, खाद्यसंस्कृती याच्या आधारावर दुही माजवत आहे असे ठरावात नमूद करण्यात आले आहे. काँग्रेसमध्ये संघटनात्मक बदल केले जात आहेत. जे पक्षाचे काम करत नाहीत,पक्षाची जबाबदारी घेत नाहीत अशांनी निवृत्त व्हावे. त्यांना आराम करण्याची गरज आहे, असे पक्षाध्यक्ष खरगे यांनी नेते व कार्यकर्त्यांना ठणकावून सांगितले. त्या दृष्टीने जिल्हा काँग्रेस बळकट केल्या जातील आणि जिल्हाध्यक्षांना व्यापक अधिकार दिले जातील. उमेदवार निवडीमध्ये त्यांचा सहभाग असेल असे खरगे यांनी स्पष्ट केले. ईव्हीएमवरून सरकारवर निशाणा साधताना खरगे म्हणाले, भाजपने असे तंत्रज्ञान बनवले आहे की ज्याचा त्यांना फायदा होईल आणि विरोधकांचे नुकसान होईल. आज आमचा पराभव होत असला तरी उद्या या देशाचे तरुण नक्की याविरोधात लढा देतील. देश सध्या एकाधिकारशाहीकडे जात आहे. सर्वसामान्य नागरिकांची संपत्ती हे सरकार आपल्या श्रीमंत मित्रांकडे हस्तांतरित करीत आहे. एकंदरीत प्रकार पाहता पंतप्रधान मोदी एक दिवस आपला देश विकून टाकतील. ते काही असो, काँग्रेसमध्ये आता विचारमंथन सुरू झाले हेही नसे थोडके!

# सामाजिक समस्येचे आर्थिक विश्लेषण

## डॉ.बळीराम पांडे:डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती

पुण्यभूमी प्रतिनिधी

औरंगाबाद:छत्रपती संभाजी नगर येथील बीड बायपास जवळील राजेश नगर मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त डॉ.बळीराम पांडे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रख्यात विचारवंत तथा अर्थशास्त्राचे अभ्यासक डॉ. बळीराम पांडे म्हणाले की, जातीव्यवस्था व अस्पृश्यता यासारख्या सामाजिक समस्येचे आर्थिक विश्लेषण करणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे पहिले अर्थशास्त्रज्ञ असावेत कारण अस्पृश्यता ही केवळ आर्थिक रचना नसून गुलामगिरीपेक्षा भयानक आर्थिक




रचना आहे. डॉ. पांडे पुढे असे म्हणाले की, गुलामगिरीत मालक गुलामाची बाजारात किमान किंमत कमी होऊ देत नाही. कमीत कमी अन्न,वस्त्र तरी पुरवतात, परंतु अस्पृश्यतेच्या रचनेत मालक कोणतेतीही जबाबदारी स्वीकारत नाही. म्हणजेच अस्पृश्याची आर्थिक पिळवणूक करतात. या वास्तवतेवर बाबासाहेब बोट ठेवतात यावर डॉ. पांडे यांनी प्रकाश टाकला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रा. विश्वास देशमुख होते.भंते कुलीनपुत्र वेससभुजी थेरो, भंते रोहितजी याने त्रिशरण व पंचशील घेऊन धम्मदेशना दिली. कार्यक्रमाला राजेशनगर मधील तरुण,जेष्ठ, विद्वान मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम प्रसंगी ज्येष्ठ साहित्यिक तात्याराव चव्हाण व सुधाकर शिंदे साहेब यांनी स्व रचित भीमगीत सादर केले. शिवाय डॉ.भक्ती चंद्रकांत कांबळे यांनी सुंदर भीम गीत सादर केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समितीचे अध्यक्ष उपासक चंद्रकांत कांबळे, सचिव प्रा.आनंद चाबुकस्वार, कोषाध्यक्ष उपासक गुलाबराव ढबाले, उपासक सुधाकर शिंदे उपासक अर्जुनराव बनसोडे, उपासक वसंत साळवे उपासिका गीता साखरे, उपासिका कांबळे मॅडम, उपासिका गीता चाबुकस्वार, उपासिका सुशीलाताई बनसोडे आदीने कार्यक्रम यशस्वीतेसाठी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. आनंद चाबुकस्वार यांनी केले तर आभार प्रदर्शन वैभवी भवर यांनी मानले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व कार्य प्रेरणादायी- प्रा. काकडे

गेवराई/प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामान्य कुटुंबात जन्म घेऊन शोषित, वंचित समाजाच्या उत्कर्षाचे महान असे कार्य केले. मानव जातीच्या उद्धारासाठी केलेले त्यांचे कार्य व विचार हे प्रेरणादायी आहेत. असे प्रतिपादन प्रा. रामहरी काकडे यांनी केले. ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३८ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी होत आहे. यानिमित्त गेवराई च्या महिला महाविद्यालयामध्ये आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. रामहरी काकडे बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विषमतेची पाळेमुळे खोलवर रुजलेल्या समाजामध्ये अस्पृश्यांना त्यांचे मानवी अधिकार मिळवून देण्यासाठी खडतर असा संघर्ष केला. त्यांचे विचार व कार्य हे आजही आपल्याला प्रेरणा, साहस व संघर्ष करण्याची शक्ती देतात. अध्यक्षीय समारोप प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजाभाऊ चव्हाण म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात उल्लेखनीय असे कार्य केले आहे. शोषित वंचित समाजासाठी त्यांनी आजन्म संघर्ष केला. त्यांच्या मेहनत व परिश्रमाने भारतीय राज्यघटना मूर्त स्वरुपात आली आहे. या कार्यक्रमाचे संचालन प्रा. बाबू वादे यांनी तर आभार प्रा. महेश घोलप यांनी मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थीनी उपस्थित होत्या.



## पान एक वरून

**लोणारमध्ये कांग्रेसची सहविचार**

उपस्थित राहावे असे अहवान राजेश मापारी तालुकाध्यक्ष लोणार तालुका काँगेस कमेटी गजानन खरात जिल्हाध्यक्ष काँग्रेस ओबीसी सेल, बुलडाणा अनिकेत मापारी जिल्हाध्यक्ष युवक काँग्रेस बुलडाणा शे. समद शे अहमद शहराध्यक्ष लोणार शहर काँग्रेस कामीटी यांनी केले आहे

**सुशांत खौतडला पोसतोय**

गावाला कडक उन्हाळ्या मध्ये फक्त अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे टाकळी या गावाला पाणी पिण्यासाठी नाही तर जलजिवन योजनेचा काय फायदा का फक्त गुत्तेदार पोचण्याचे काम आहे का सुशांत खवतड गुत्तेदारावर कार्यवाही कधी होणार सिईओ साहेब नागरिकांन मध्ये चर्चा सत्र सुरू झाले आहे.

**वकील संघाकडून जयंती**

समारोप माजलगाव वकील संघाचे अध्यक्ष ॲड. बी. आर. डक साहेब यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन माजलगाव वकील संघाचे उपाध्यक्ष ॲड. एस. एस. कसबे यांनी केले.या जयंती कार्यक्रमास वकील संघातील सन्माननीय सदस्य ॲड. एस. के. गोंडे (नाना ), ॲड. बी. जे. खरात, ॲड. बाळासाहेब उर्फ बाळकृष्ण तेरकर, ॲड. सुधाकर गरड, ॲड. सचिन राऊत, ॲड. निळकंठ नायकोडे, ॲड. भागवत हिंगण, ॲड. विजय मस्के,ॲड. कैलास डोंगरे, ॲड. चेतन सातपुते, ॲड. एच. एस. बडे, ॲड. राहुल बजाज यांच्या सह इतर सन्माननीय सदस्यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढविली व कार्यक्रम यशस्वी पार पाडला.

**ज्याचं जळतंय त्यालाच**

जयंती निमित्त पगार दिला जात नाही.यामुळे बहुजन समाजाची नेहमीच घोरनिराषा होते. प्रशासनातील काही अधिकारी व कर्मचारी हे जातीयवादी दृष्टिकोनातून वेतनाकडे पाहतात की काय असं समज आंबेडकरवादी कर्मचाऱ्यांचा होत आहे. त्याचे कारण मार्च एंड असताना जयंतीनिमित्त पगार करायचा नाही मात्र इतर हेडचे बिलं, गुत्तेदारांची तसेच इतरांची बिलं काढण्यात हे अधिकारी कर्मचारी गुंग असतात.कारण त्यांना त्यातून मिळकत प्राप्त होत असेल.आणि त्यामुळेच ते जिल्हा परिषद शिक्षक कर्मचाऱ्यांची सर्व वेतन देयके बाजूला ठेवतात.असंच सर्वांना वाटतं.अगोदरच अशैक्षणिक कामांच्या बोजामुळे व सावकारी,बँकांच्या कर्जबाजारीपणामुळे,आर्थिक सामाजिक पत ढासळल्यामुळे जिल्हा परिषदेत काम करणारा शिक्षक पूर्णतः वैतागून गेला आहे. त्यामुळे प्रशासन इतर विभागात ज्या पद्धतीने अशैक्षणिक कामासाठी जिल्हा परिषद शिक्षकांचा वापर करते, त्याचप्रमाणे त्यांचे स्वतःचे वेतन दरमहा वेळेवर होण्यासाठी सुद्धा त्यांनाच प्रतिनियुक्त करावे व अशा कामचुकार अधिकारी कर्मचाऱ्यावर कारवाई करावी अशा आशयाची मागणी प्रसिद्धी पत्रकांन्वे महा.राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाचे जि.संघटन प्रमुख भारतभाऊ टाकणखार,ता.सचिव अभिमन्यू इबिते,जि.उपाध्यक्ष वसंत टाकणखार,रवी आदमाने,राहुल खुणे,शिवाजी भाळशंकर,किरण शिंदे,निलेश गावडे,अमोल राऊत,नितीन पुटवाड,मतीन शेख,गोरख उघडे,गोविंद पवार,सय्यद आयुब,हनुमंत पांढरपोटे,नारायण भाळशंकर,राजेंद्र सातपुते,प्रवीण जाधव,सुमेध घाडगे व ता.अध्यक्ष राहुलकुमार टाकणखार यांनी केली आहे.

**बावची येथे जोतिबा**

मिरवणुक काढण्यात येणार आहे तरी पंचक्रोशीतील भावि भक्तांनी दख्खनचा राजा जोतिबा देवाच्या पालखी मिरवणूकीत सहभागी होऊन मनोभावे लाभ घ्यावा तसेच अशा प्रकारे प्रतिवर्षा प्रमाने दख्खनचा राजा जोतिबा देवाची यात्रा महोत्सव भालगाव बावची येथे मोठ्या उत्साहात होनार आहे तरी केज तालुक्यातील भावी भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन भालगाव बावची गावकऱ्यांनी केले आहे.या विषयी सविस्तर वृत्त असे की केज तालुक्यातील भालगाव बावची येथे दख्खनचा राजा जोतिबा देवाची यात्रे निमित्त १६ तारखेला बुधवारी ४ वाजता गाडेओढने यात्रे महोत्सवाचा कार्यक्रम आहे तरी पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी मनोभावे आनंद घेण्यासाठी बुधवारी ४ वाजता भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन गावकऱ्यांनी केले आहे तसेच दि.१७ तारखेला पहाटे छबीना मिरवणुक काढण्यात येणार आहे

## पान सहा वरून

**थापा मारुनच सत्तेत आले**

फअसलेल्या महिलांनी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेतल्यानं त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले असून, त्यांच्याकडून पैसेही वसूल करण्यात आल्याचा दावा विरोधकांकडून केला जात आहे. याबाबत राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी कोणत्याही महिलांवर गुन्हा दाखल केला नसून, वसुली केलेली नाही, निष्कारण भ्रम पसरवला जात असल्याचे म्हटले.

**भाजपा कार्यकर्त्याची निर्घृण**

केल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. हत्येनंतर आरोपी स्वतःहून थेट शहर पोलीस स्टेशनमध्ये हजर झाला. पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतलं असून गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. ही घटना भाजपा कार्यालयापासून अगदी हाकेच्या अंतराजवळ घडली आहे. बाबासाहेब आगे हा भारतीय जनता पक्षाचा कार्यकर्ता असल्याची माहिती समोर येत आहे. हत्या झाल्यानंतर रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या बाबासाहेबच्या मृतदेहाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत असून त्यामध्ये आरोपीदेखील दिसत आहे.

**लातुरचे आयुक्त धोक्यातून बाहेर घेतायेत**

काही भागात संवेदना कमी असल्याने डाव्या बाजूच्या अवयवयांची हालचाल कमी होत असली तरी त्याच्या उजव्या बाजूचे अवयव पुवर्वत पणेच हालचाल करीत आहेत. त्यांच्यावर लातूरातील सह्याद्री हॉस्पीटल मध्ये जी ट्रीटमंट सुरू होती तीच सेम ट्रिटमेंट कोकीळाबेन हॉस्पीटल मध्ये सुरू असून आता त्यांना कृत्रीम श्वासोश्वास देणारे व्हेंटीलेटर काढण्यात आले असून आता ते स्वत: चांगल्याप्रकारे श्वासोश्वास घेत आहेत.महापालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांच्यावर तिस-या दिवसापासून त्यांच्यावर फिजोथेरेपीचे उपचार सुरू करण्यात आले असून ते आता ही सुरूच असल्याची माहीती त्यांच्यावर प्राथमिक उपचार ते यशस्वी शस्त्रक्रिया करून त्यांना मृत्खूच्या दाडेतून बाहेर काढणारे तसेच मुंबई येथील कोकीळा बेन हाम्स्पीटल मध्ये आयुक्त मनोहरे यांच्यावर उपचार करणा-या वैद्यकीय तज्ज्ञांच्या संपर्कात असलेले डॉ हणमंत किनीकर यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

**आज जिल्हा गुंतवणूक**

उद्या होणा-या या परिषदेस विकास आयुक्त (उद्योग), अध्यक्ष मैत्री दिपेंद्रसिंह कुशवाह तसेच जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.यात उद्योजक तसेच इतरांनी सहभागी व्हावे, असे आवाहन सहसंचालक बी.टी. यशवंते आणि जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक किरण जाधव यांनी केले आहे.

**सोमय्या विरोधात मुस्लिम**

दरम्यान, सोमय्या हे बांगलादेशी घुसखोरांच्या आडून जिल्ह्यातील सामाजिक सलोखा बिघडवत असून समाजात द्वेष पसरवत आहेत. जाणूनबुजून मुस्लिम समाजाला टार्गेट करणाऱ्या किरीट सोमय्या यांनी केलेल्या मागण्या मान्य न करता त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी करण्याची मागणी सकल मुस्लिम समाजाने एका निवेदनाद्वारे तहसलिदारांकडे केली आहे

**नगराध्यक्षांना हटविण्याचे...**

पाठवता येईल. या प्रस्तावावर जिल्हाधिका-यांना १० दिवसांच्या आता विशेष सभा आयोजित करून मतदानाद्वारे निर्णय घ्यावा लागेल.यापुर्वी नगराध्यक्षांना पदावरुन दूर करण्यासाठी निवडून आलेल्या सदस्यापैकी पन्नास टक्के सदस्यांच्या सह्यांचा प्रस्ताव जिल्हाधिका-यांकडे पाठवला जात असे. त्यानंतर शासनस्तरावर अध्यक्षांना पदावरून दूर करण्याची कारवाई केली जात असे. त्याऐवजी आता अध्यक्षांना पदावरून हटवण्यासाठी निवडून आलेल्या सदस्यांना अधिकार दिले जाणार आहेत. सध्या अस्तित्वात असलेल्या १०५ नगरपरिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक नगरीच्या लोकनियुक्त नगरसेवकांना हे अधिकार लगेच मिळणार आहेत.राज्य सरकारने नगराध्यक्षांना पदावरून हटविण्याबाबतच्या अधिनियमात सुधारणा केल्याने अनेक वर्ष रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका यंदाच्या वर्षी दिवाळीनंतर होण्याचे संकेत मिळत आहेत. सर्व प्रमुख राजकीय पक्षांनी स्थानिक निवडणुका डोळ्यासमोर ठेवून मोर्चेबांधणी सुरु केली आहे.

राज्यातील महानगरपालिकांच्या स्थावर मालमत्ता व नगरपरिषदा, नगरपंचायती, औद्योगिक नगरीतील मालमत्ता भाडेपट्ट्याने देण्याच्या नियमांमध्ये एकवाक्यता आणण्यात येणार आहे. त्याकरिता नवीन दरांबाबत अधिसूचना काढण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. राज्यातील महानगरपालिकांच्या स्थावर मालमत्ता भाडेपट्ट्याने देणे, त्यांचे नूतनीकरण व हस्तांतरण याबाबत ६ नोव्हेंबर २०२३ रोजी नियम निश्चित करण्यात आले आहेत. त्यालाच अनुसरून आता राज्यातील सर्व नागरी स्थानिक संस्थांतील मालमत्तांच्या हस्तांतरणांत एकवाक्यता आणण्यात येणार आहे. त्यासाठी महानगरपालिका मालमत्ता हस्तांतरण नियमावलीच्या धर्तीवर महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी (स्थावर मालमत्तेचे हस्तांतरण) (सुधारणा) नियम २०२५ निश्चित करण्यात येणार आहेत.नगरपरिषद, नगरपंचायत, औद्योगिक नगरी यांच्या मालमत्तांचे निवासी, शैक्षणिक, धर्मादाय व सार्वजनिक, व्यावसायिक व औद्योगिक असे वर्गीकरण करण्यात आले आहे. यात सुधारित नियमानुसार निवासी, शैक्षणिक, धर्मादाय व सार्वजनिक वापरासाठीच्या मालमत्तांचा भाडेपट्टा दर हा वर्तमान बाजारमूल्याच्या (रेडी रेकनर)०.५ टक्के पेक्षा कमी असणार नाही. तसेच व्यावसायिक व औद्योगिक वापरासाठीच्या मालमत्तेचा बाजारमूल्याच्या ०.७ टक्के पेक्षा कमी असणार अशी तरतूद करण्यास आज मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. नगरपरिषदांच्या मालमत्तांचे अधिमुल्य, भाडेपट्टा दर व सुरक्षा ठेव निश्चिती ही संबंधित जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील पाच सदस्यीय समिती करेल. सदर नियमांबाबत हरकती व सूचना मागविण्यात येतील व त्यानंतर अंतिम अधिसूचना प्रसिद्ध करण्यात येईल.

**उड्डाण पूलावरील भिंत**

धडकेत सदरील भिंतीचा बराचसा भाग कोसळला होता.जो आज धोकादायक बनलेला आहे.याच तुटलेल्या भिंत, कठड्याला खेटून दररोज हजारो वाहने जात असतात.त्यामुळे कधीही हा तुटलेला भाग मोठ्या अपघाताचे कारण ठरू शकतो. सार्वजनिक बांधकाम विभाग, उपविभाग परळी तसेच कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,अंबाजोगाईचे अधिकारी याच ठिकाणी दुसऱ्या अपघाताची वाट पाहत आहेत का असा सवाल निर्माण झाला आहे.नागरिकांची व वाहनधारकांची सुरक्षा लक्षात घेता या तुटलेल्या भिंतीची लवकरात लवकर दुरुस्ती करण्याची आवश्यकता आहे.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स ॲन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com



## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विधान भवनात अभिवादन

**मुंबई :** भारतीय राज्यघटनेचे थोर शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त विधान भवन परिसरातील त्यांच्या पुतळ्यास विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. याप्रसंगी महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालयाचे सचिव शिवदर्शन साठ्ये, उपसचिव विजय कोमटवार यांच्यासह अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास गुलाबपुष्प अर्पण करुन अभिवादन केले.

# भारत लोकशाही मार्गावर चालत आला, याचे कारण संविधान!

◆ **मुंबई (विशेष प्रतिनिधी):**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त, माननीय राज्यपाल राधाकृष्णन यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह दादर परिसरातील चैत्यभूमी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतिस्थळाला सोमवारी १४ एप्रिल २०२५ रोजी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. त्यानंतर आयोजित कार्यक्रमात बोलतांना राज्यपालांनी, स्वातंत्र्यानंतर भारताच्या शेजारील अनेक राष्ट्रांमध्ये लोकशाही रुजली नाही. परंतु भारत सातत्याने लोकशाही मार्गावर चालत आला, याचे श्रेय भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तयार केलेल्या संविधानाला जाते, असेही स्पष्ट केले.

महाराष्ट्राच्या भूमीने देशाला छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या रूपाने दोन महान सुपुत्र दिले. छत्रपती शिवाजी महाराजांनी परकीय आक्रमणापासून देशाला वाचविले, तर भारतरत्न डॉ. आंबेडकर यांनी समतेसाठी आपले जीवन वेचले,



### राज्यपाल राधाकृष्णन यांनी मांडले स्पष्ट विचार

असे राज्यपाल यावेळी सांगितले. धर्म परिवर्तनाचा विचार त्यांच्यापुढे आला, त्यावेळी त्यांनी भारताच्या मातीत निर्माण झालेल्या बौद्ध धर्माचा अंगीकार केला, यावरुन डॉ. आंबेडकर यांचे द्रष्टेपण दिसून येते, असे राज्यपालांनी नमूद केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे राष्ट्रनिर्माते होते.

नेहमी समाजाचा, देशाचा व विश्वकल्याणाचा विचार करणारे ते सच्चे राष्ट्रपुरुष होते. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताला एकसंध ठेवण्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान अतुलनीय आहे. अनेक शतकांपासून रुजलेल्या चुकीच्या रूढी व परंपरा यांच्या जोखडातून त्यांनी देशाला मुक्त केले व समानता प्रस्थापित केली, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

पुढे ते म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक उत्तम प्रशासक होते. कठीण परिस्थितीत शिक्षण घेताना त्यांनी समाज उत्थानाचा विचार सोडला नाही. कामगार कल्याण, पाटबंधारे व ऊर्जा या क्षेत्राबद्दल डॉ आंबेडकर यांचे चिंतन आणि कार्य वाखाणण्याजोगे होते. देशाच्या विकासाचा पाया रचण्याचे कार्य डॉ. आंबेडकर यांनी केले, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस समारोपात म्हणाले. यावेळी राज्यपाल महोदयांसह सर्व मान्यवरांनी भारतरत्न डॉ. आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित छायाचित्र प्रदर्शनाला भेट दिली. भीमज्योतीला वंदन केले तसेच उपस्थित भिक्खूंना चिवरदान केले. दृष्टिबाधित विद्यार्थ्यांना भेटवस्तुंचे वितरण करण्यात आले.

विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, सांस्कृतिक कार्य आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री तथा मुंबई उपनगरे जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आशीष शेलार, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ, मृद् व जलसंधारण मंत्री संजय राठोड, माजी मंत्री विजय (भाई) गिरकर, महाराष्ट्र राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुंबईमहानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, कोकण महसूल विभागाचे विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, माजी खासदार राहुल शेवाळे, महानगरपालिकेचे उप आयुक्त (परिमंडळ दोन) प्रशांत सपकाळे, जी उत्तर विभागाचे सहायक आयुक्त विनायक विसपुते आदींसह विविध मान्यवर, अधिकारी, सामाजिक संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

# डॉ. बाबासाहेबांच्या विचारातूनच संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

मुंबई ही महाराष्ट्राची आहे, असे ठणकावून सांगणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. मुंबई आणि महाराष्ट्र हे एकमेकात रमलेले आहे. भाषावार प्रांतरचनेत मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारातूनच झाली असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई आणि बाबासाहेब यांचे अतूट नाते असल्याचे प्रतिपादित केले. वडाळा पूर्व येथील कोरबे मिठागर भागात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात त्यांनी संबोधित केले. कार्यक्रमास व्यासपीठावर सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड आशिष शेलार, आमदार कालिदास कोळंबकर, आमदार कॅप्टन तमिल सेलवन आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले, मुंबईतील त्यांच्या कार्य कर्तृत्वाला उजाळा देण्यासाठी राज्य शासन इंदू मिल येथे त्यांचे भव्य स्मारक साकारत आहे. त्यांनी दिलेले संविधान हे जगातील सर्वोत्तम संविधान आहे. संविधानाच्या तत्त्वावर देशाचा कारभार सुरू आहे. या संविधानानेच देशाच्या महासत्तेचा मार्ग प्रशस्त केला आहे. बाबासाहेबांचा पुतळा हा संविधानशिवाय अपूर्ण असतो. त्यांनी संविधानाच्या माध्यमातून शोषित, पीडित लोकांना न्याय देण्याचे काम केले. संविधानाने सर्वांना समान संधी उपलब्ध करून दिली. संविधान निर्माण करताना त्यांची दूरदृष्टी आणि बुद्धीची प्रगल्भता लक्षात येते. डॉ. बाबासाहेबांचा मॅट्रिक उत्तीर्ण झाल्यानंतर पहिला सत्कार मुंबईत झाला. एवढेच नव्हे तर, केंद्रीय मंत्री, प्रांतिक अध्यक्ष, गोलमेज परिषदेवरून देशात परत आल्यावर, राज्यघटना पूर्ण करून परत आल्यानंतर अशा अविस्मरणीय क्षणी बाबासाहेब आंबेडकर यांचा सत्कार मुंबईमध्येच झाला. बाबासाहेब यांनी वयाची ५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल चैत्यभूमीवर अभिवादन सभाही मुंबईतच पार पडल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले. बाबासाहेबांच्या संपूर्ण जीवनपटात त्यांना उजाळा देणारे, त्यांच्या स्मृती जागविणारे अनेक प्रसंग मुंबईने अनुभवले आहेत. त्यांच्या पुस्तकांचे प्रकाशन आणि प्रिंटिंगही मुंबईतच झाले. त्यांच्या राजकीय आयुष्याचे अनुष्ठान हे मुंबईतूनच सुरू झाले. शोषितांचा आवाज बनवून ते आयुष्यभर लढले, असेही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. प्रास्ताविक आमदार कोळंबकर यांनी केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. तसेच रुग्णवाहिकेचे लोकार्पणही करण्यात आले. कार्यक्रमाला परिसरातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



वडाळा येथील कोरबा मिठागर भागात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण

# 'गेटवे ऑफ इंडिया येथील प्रवासी धक्का स्थलांतरित करा'

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

गेटवे ऑफ इंडिया येथील प्रवासी जलवाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी रेडिओ क्लब, अपोलो बंदर येथे नवीन प्रवासी धक्क्याचे (जेट्टी) काम सुरु करण्यात आले आहे. मात्र, त्याला सुरुवातीपासून कुलाबावासियांनी विरोध केला असून तो दुसरीकडे स्थलांतरित करावा अशी मागणी केली होती. आता त्याला शिवसेना (शिंदे गट) राज्यसभा खासदार मिलिंद देवरा यांनीही पाठिंबा दिला असून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पत्राद्वारे मागणी केली आहे. गेट वे ऑफ इंडिया येथून जलप्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून भविष्यात या प्रवासी संख्येंत आणखी वाढ होण्याचा अंदाज महाराष्ट्र सागरी मंडळाने वर्तविला होता. ही बाब लक्षात घेत सागरी मंडळाने गेट वे ऑफ इंडिया येथील प्रवाशांचा ताण कमी करण्यासाठी अपोलो बंदर परिसरातील रेडिओ क्लबजवळ एक मोठा धक्का बांधण्याचा निर्णय २०२२ मध्ये घेतला होता. तो बांधण्याचा प्रस्ताव केंद्र सरकारने मंजूर केला. त्यानुसार तेथे एकाचवेळी १० ठिकाणी २० बोटी उभ्या करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.



काही दिवसांपूर्वी या प्रकल्पाचे भूमिपूजनही करण्यात आले. दरम्यान, कुलाबावासियांनी मात्र या प्रकल्पाला सुरुवातीपासून विरोध दर्शवला. स्थानिक समस्यांचा विचार न करता या धक्क्याचे नियोजन केले जात असल्याचा आरोप रहिवाशांनी केला आहे. गेटवे ऑफ इंडिया हे मुंबईतील महत्त्वाचे पर्यटनस्थळ असून रोज हजारो पर्यटक येथे भेट देतात. मात्र, त्याच परिसरातून बोटींची सततची ये-जा, प्रवाशांची गर्दी आणि धक्क्यावरील गोंधळ यामुळे परिसराचा ऐतिहासिक व पर्यावरणीय समतोल बिघडेल असे देवरा यांनी पत्रात अधोरेखित केले आहे. तसेच मुंबईतच अन्य ठिकाणी प्रवासी धक्का हलवता येईल. त्यासाठी शासनाने सर्व संबंधित यंत्रणांशी समन्वय साधून अभ्यासपूर्ण निर्णय घ्यावा, अशी त्यांनी मागणी केली आहे.

## बुलेट ट्रेन मार्गावर ७० मीटर लांबीचा स्टील पूल उभारला

**मुंबई :** मुंबई ते अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी अत्यावश्यक असलेला सातवा ७० मीटर लांबीचा स्टील पूल गुजरातमधील वडोदरा येथे उभारण्यात आला आहे. डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड (डीएफसीसीआयएल) रेल्वे मार्गावर हा ६७४ मेट्रिक टन वजनाचा 'मेक इन इंडिया" स्टील पूल उभारला आहे. बुलेट ट्रेन मार्गावर आतापर्यंत ७ पूल उभे केले असून १०,००० मेट्रिक टनांपेक्षा जास्त वजनाचे हे पूल आहेत. वडोदरा येथे उभारण्यात आलेल्या पुलाची उंची १३ मीटर आणि रुंदी १४ मीटर असून ६७४ मेट्रीक टन वजनाचा स्टील पूल आहे. हा पूल कोलकत्यातील दुर्गापूर येथील कारखान्यात तयार करण्यात आला. तसेच या पुलाची उभारणी करण्यासाठी विशेष वाहनाद्वारे बांधकामस्थळी नेण्यात आला.

# अथर्व थिएटर्सचा पारितोषिक समारंभ उत्साहात

◆ **मुंबई (प्रतिनिधी):**

अथर्व थिएटर्सचा पारितोषिक वितरण उत्साहात पार पडला. यावेळी बालरंग आणि शिक्षकांना संजीवनी पुरस्कार देवून गौरविण्यात आले. अथर्व थिएटर्स ही संस्था गेली २४ वर्षे शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत आहे. स्पर्धा, प्रशिक्षण आणि निर्मिती अशा वेगवेगळ्या विभागात बालकलाकारांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांसाठी विविध उपक्रम राबवित असते. दरवर्षी महाराष्ट्र उत्सव अर्थात विविध स्पर्धांचा महोत्सव या उपक्रमांतर्गत संस्थेच्या वतीने बोरीवली, दादर, ठाणे, कामोठे आणि कोल्हापूर अशा विविध भागात ऑनलाइन आणि ऑफलाइन स्पर्धा घेण्यात येतात.

या स्पर्धांमध्ये चित्रकला, नृत्य, अभिनय, गीतगायन अशा विविध स्पर्धा असतात. येणारे वर्ष हे संस्थेचे २५ वे वर्ष आहे. त्यामुळे सामूहिक स्पर्धांचे देखील आयोजन करण्यात येणार आहे. नुकत्याच




पार पडलेल्या स्पर्धांचा पारितोषक वितरण सोहळा शुक्रवार (दि.११) श्री शिवाजी मंदिर येथे संपन्न झाला. या सोहळ्या दरम्यान महाराष्ट्रातील उत्कृष्ठ कामगिरी करणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांना बालरंग पुरस्कार आणि शिक्षकांना संजीवनी पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

या दरम्यान ज्येष्ठ संगीतकार सोमनाथ परब यांना कला संजीवनी पुरस्कार देऊन यांचा विशेष सत्कार करण्यात आला. या सोहळ्याचे प्रमुख अतिथी किसन पावडे (प्रशासकीय अधिकारी),सचिन सूर्यवंशी (पोलीस निरीक्षक), चंद्रशेखर सांडवे, नवनाथ पानसकर (रोटरी क्लब ऑफ साऊथ बॉम्बे, मारुती शेरकर (मुख्याध्यापक),डॉ.राजू बंडगर हे होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किशोरी दाभोळकर महापौर पुरस्कार प्राप्त शिक्षिका तसेच संस्थेचे सचिव शिवाजी वामन (वामन इनवेस्टमेंट या कंपनीचे सीईओ) आणि मंदाकिनी पाटील (स्वीट एंजल्सच्या सीईओ) अध्यक्ष विरेंद्र नेवरेकर यांनी या सोहळ्याचे आयोजन केले असून संस्थेच्या उपाध्यक्षा वीणा नेवरेकर, संयोजक मुकेश गोविंद, जयश्री इंगळे यांनी यशस्वीरीत्या संयोजन केले. या सोहळ्याला अनेक मुख्याध्यापक, शिक्षक, स्पर्धक आणि मान्यवर उपस्थित होते. संस्थेच्या वतीने रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त लवकरच पुढील उपक्रम घोषित करण्यात येणार आहे.

# सलमान खानला मारणार, वाहतूक पोलिसांना आली धमकी

**मुंबई :** अभिनेता सलमान खानला पुन्हा धमकी आली आहे. वाहतूक पोलिसांच्या नियंत्रण कक्षाला धमकीचा संदेश आला आहे. याप्रकरणी वरळी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स्थानिक पोलीस व गुन्हे शाखा याप्रकरणी अधिक तपास करत आहे. वाहतूक पोलिसांच्या नियंत्रण कक्षाच्या व्हॉट्स ॲप क्रमांकावर रविवारी हा धमकीचा संदश आला होता. त्याबाबतची माहिती वरळी पोलिसांना दिल्यानंतर त्यांनी याप्रकरणी संदेश पाठवणाऱ्या व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल केला आहे. धमकी देणे, शांतता भंग केल्याप्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम ३५१(२) व ३५१(३) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. सलमान खानला घरात घुसून मारणार तसेच त्याची मोटरगाडी बॉम्बस्फोटात उडवून देण्याची धमकी संदेशात देण्यात आली आहे.

# महिला प्रवाशांच्या सुरक्षेसाठी बसमध्ये 'पॅनिक बटण'




**मुंबई :** गेल्या काही कालावधीपासून महिलांच्या एसटी प्रवासातील सुरक्षेबाबत निर्माण झालेल्या प्रश्नांच्या पार्श्वभूमीवर महिला प्रवाशांच्या सुरक्षेसाठी बसमध्ये 'पॅनिक बटण' लावण्यात येणार आहे. प्रत्येक बसस्थानकावर व नवीन येणाऱ्या बसमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे, सुरक्षा रक्षकांची संख्या वाढवण्यावर भर दिला जाणार आहे. यासह एसटी बस स्थानकांचे आधुनिकरण करून, प्रवाशांना दर्जेदार सुविधा प्रदान करण्यावर लक्ष केंद्रीत केले जाणार आहे, असे परिवहनमंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी सांगितले.



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४वी जयंती मुंबई भोईवाडा परिसरात आनंद खांबे, सुनील सावंत, भीम, नागेश खांबे, लऊ उमासरे, संतोष भालेकर, सदानंद घाडगे आणि गणेश साविणकर यांच्या सहकार्याने मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

# ३० हजारासाठी केला सैफवर हल्ला; पोलिसांचा आरोपपत्रात खुलासा



◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

अभिनेता सैफ अली खान याच्या मुंबईतील वांद्रे येथील घरात घुसून त्याच्यावर हल्ला केल्याची घटना काही दिवसांपूर्वी घडली होती. सैफच्या घरात घुसलेला या बांगलादेशी आरोपीला बनावट आधार कार्ड आणि पॅन कार्ड मिळवण्यासाठी ३० हजार रुपये चोरायचे होते अशी माहिती मुंबई पोलिसांनी कोर्टात दाखल केलेल्या आरोपपत्रात दिली आहे. पोलिसांनी दाखल केलेल्या आरोपपत्रानुसार, मोहम्मद शहजाद यांने पोलिसांना सांगितले की तो फक्त भारतीय पासपोर्ट मिळवण्याच्या उद्देशाने भारतात आला होता.

त्याने सांगितले की, बांगलादेशी नागरिकांच्या तुलनेत भारतीय नागरिक म्हणून परदेशातील वर्क व्हिसा मिळवणे सोपे जाते. त्याला आधी आधार आणि पॅन कार्ड मिळवायचे होते आणि त्यानंतर तो पासपोर्टसाठी अर्ज करणार होता. शहजाद याने पोलिसांना सांगितले की तो बांगलादेशातील झालकाठी जिल्ह्यातील रहिवासी असून सैफवर हल्ला झाला त्याच्या आठ महिन्यांपूर्वी तो बेकायदेशीर पद्धतीने भारतात आला होता. तो १५ दिवस कोलकाता येथे राहिला त्यानंतर गितांजली एक्स्प्रेसने प्रवास करून तो मुंबईला आला.

## मुंबई विमानतळावर कोकेनसह परदेशी प्रवासी अटकेत

**मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर सीमा शुल्क अधिकाऱ्यांनी केलेल्या कारवाईत सुमारे ७८५ ग्रॅम कोकेन जप्त केले आहे. त्याची आंतरराष्ट्रीय बाजारात किंमत अंदाजे पावणे आठ कोटी रुपये आहे. या प्रकरणात एका परदेशी प्रवाशाला अटक करण्यात आली. त्याच्याविरोधात अमलीपदार्थ प्रतिबंधक कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपी युगांडा येथून भारतात आला होता. त्यावेळी त्याच्या पोटात संशयीत कॅप्सूल असल्याचे निष्पन्न झाले. युगांडाहून आलेल्या विमानातील एका प्रवाशाचा सीमाशुल्क अधिकाऱ्यांना संशय आला. त्यामुळे सीमाशुल्क अधिकाऱ्यांनी त्या प्रवाशाला थांबवले. चौकशीदरम्यान संबंधित प्रवासी घाबरलेला व अस्वस्थ असल्याचे दिसले. नंतर त्याच्यावर वैद्यकीय तपासणी करण्यात आली. त्यात पोटात पिवळ्या रंगाच्या अनेक कॅप्सूल गिळल्याचे उघड झाले. वैद्यकीय देखरेखीखाली त्या गोळ्या बाहेर काढण्यात आल्या.

# अन्यायकारक अध्यादेश बदला

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

पुनर्विकासाला आमचा विरोध नाही, पुनर्विकास म्हाडाने करावा किंवा कन्स्ट्रक्शन अँड डेव्हलपमेंट (सीअँडडी) कंपनीमार्फत करावा यालाही आमची हरकत नाही. मात्र, तत्कालीन महाविकास आघाडी सरकारने सन २०२१ साली मोतीलाल नगरच्या पुनर्विकासासंदर्भात जो अन्यायकारक अध्यादेश (जीआर) काढला होता, त्या जीआरलाच आमचा तीव्र विरोध आहे. कारण या जीआरनेच पुनर्विकासाअंतर्गत मोतीलाल नगरकरांच्या वाढीव क्षेत्रफळाचा अधिकार हिरावून घेतला आहे. महायुती सरकारने मागच्या काळातील अनेक निर्णय बदलत किंवा रद्द करत जनतेला दिलासा दिलेला आहे, त्याचप्रमाणे या जीआरमध्ये दुरुस्ती करावी किंवा जुना जीआरच रद्द करावा व नवा जीआर काढून पुनर्विकास प्रकिया नव्याने सुरू करावी, मोतीलाल नगरकरांना त्यांच्या हक्काची वाढीव जागा मिळावी, अशी ठाम भूमिका मोतीलाल नगर मधील रहिवाशांनी मांडली.



### रहिवाशांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

मोतीलाल नगर विकास समितीच्या माध्यमातून गोरेगाव पश्चिमेकडील पिकासो हॉलमध्ये पुनर्विकास मार्गदर्शन सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेला मोतीलाल नगरच्या ३७०० गाळेधारकांनी उपस्थित राहत आपले म्हणणे मांडले. लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भेटून रहिवाशांच्या मागण्यांचे निवेदन देणार असल्याचे मोतीलाल नगर विकास समितीने स्पष्ट केले. समितीने आधीच मुंबई उच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल केली असून राज्य सरकारने मागणीला दाद न दिल्यास सर्वोच्च न्यायालयात जाण्याची तयारीही रहिवाशांनी केली आहे.

# आता जुलै-ऑगस्टमध्येही देता येणार दहावी-बारावीची परीक्षा

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे दहावी आणि बारावीच्या परीक्षेसाठी फॉर्म नंबर १७ भरून परीक्षा देणाऱ्या खासगी विद्यार्थ्यांना आता जुलै-ऑगस्ट २०२५ मध्येही परीक्षा देता येणार आहे. यापूर्वी केवळ फेब्रुवारी-मार्च मध्ये परीक्षा देता येत होत्या. या परीक्षेसाठी ऑनलाइन नावनोंदणी अर्ज करण्यासाठी १५ एप्रिलपासून सुरुवात होणार आहे. ही मुदत एक महिना असणार आहे.

दहावी आणि बारावीच्या काही विद्यार्थ्यांना शाळेतून, महाविद्यालयातून किंवा कोणत्याही मान्यताप्राप्त शिक्षणसंस्थेतून परीक्षा देणे शक्य होत नाही. त्यामुळे असे विद्यार्थी खासगी पद्धतीने अर्ज करून म्हणजे फॉर्म नंबर १७ भरून परीक्षा देतात. अशा परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षण मंडळाने दिलासा दिला आहे. यासंदर्भातील



सर्व माहिती मंडळाच्या http://www.mahahsscboar d.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. १५ एप्रिल ते १५ मे या कालावधीत अर्ज करता येणार आहेत. खासगी विद्यार्थी म्हणून प्रविष्ठ होण्यासाठी फेब्रुवारी मार्च २०२५ च्या परीक्षेवेळी ज्या अटी व शर्ती निर्धारित केलेल्या होत्या, त्याच अटी व शर्ती जुलै-ऑगस्ट २०२५ च्या परीक्षेसाठी कायम राहतील. नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीनेच भरायचे आहेत. त्यामुळे कोणाचाही ऑफलाईन अर्ज स्वीकारला जाणार नाही. नावनोंदणी अर्ज करताना विद्यार्थ्यांनी http://www.mahahsscboard.in या संकेतस्थळावरील Student Corner या option चा वापर करावा असेही राज्य मंडळाने म्हटले आहे.

## मिठी नदीवरील पुलाच्या पुनर्बांधणीचे काम पूर्ण

**मुंबई :** पश्चिम रेल्वेवरील वांद्रे आणि माहीम स्थानकांदरम्यानच्या मिठी नदीवरील रेल्वे पुलाची पुनर्बांधणी पूर्ण करण्यात आली आहे. पूल क्रमांक २० च्या पुनर्बांधणीसाठी पश्चिम रेल्वेने ११ आणि १२ एप्रिलच्या मध्यरात्री सुमारे आठ तासांपेक्षा अधिक ब्लॉक घेऊन हे काम पूर्ण केले. त्यामुळे या मार्गावरील शेवटचा स्क्रू पूल आता अधिक भक्कम झाला आहे. या पुलाच्या कामासाठी पश्चिम रेल्वेला मोठी कसरत करावी लागली. मिठी नदीच्या दोन्ही बाजूंना (पूर्व आणि पश्चिम) भरती-ओहोटी लक्षात घेऊन काम करावे लागले पुलाच्या जागेवर जाण्यासाठी थेट रस्ता उपलब्ध नसल्याने यंत्रसामग्री आणि साहित्यांची जमवाजमव, ने-आण ही तीन स्टेबलिंग लाईन्स ब्लॉक करून केले होते. पुनर्बांधणीत पुलाचे जुने खांब आणि गर्डर बदलून त्याच्या जागी नवीन खांब उभारले आहेत. मार्च २०२३ मध्ये या पुलाच्या बांधकामासाठी ईपीसी पद्धतीने निविदा मागवली होती, असे रेल्वे अधिकाऱ्याने सांगितले.

## राज्यातील ८ अग्निशमन अधिकारी, जवानांना राष्ट्रपती पदके प्रदान

# अग्निशमन संशोधन संस्था निर्माण करा : राज्यपाल राधाकृष्णन यांचे आवाहन

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

वाढती लोकसंख्या, महानगरांची उर्ध्व दिशेने होणारी वाढ तसेच वाढती औद्योगिक क्षेत्रे यामुळे आग व इतर आपत्तींना तोंड देणे आव्हानात्मक झाले आहे. रसायनांमुळे उद्भवणाऱ्या आगी, औद्योगिक अपघात, नैसर्गिक संकट तसेच अतिरेकी हल्ल्यांमुळे अग्निशमन दलापुढे नवनवी आव्हाने ठाकत आहेत. या परिस्थितीत अग्निशमन सेवा दलापुढे पायाभूत सेवा-सुविधांचे रक्षण करणे, सार्वजनिक ठिकाणांची सुरक्षा जपणे व औद्योगिक संपदेचे संरक्षण करणे ही महत्वाची जबाबदारी आहे असे प्रतिपादन राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी केले.



राष्ट्रीय अग्निशमन दिनानिमित्त राज्यस्तरीय अग्निशमन सेवा सप्ताहाचा शुभारंभ राज्यपालांच्या प्रमुख उपस्थितीत राजभवन मुंबई येथे करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. मुंबई अग्निशमन दलातील ८ अग्निशमन अधिकारी व कर्मचाऱ्यांना यावेळी राज्यपालांच्या हस्ते गुणवत्तापूर्ण अग्निशमन सेवेकरिता जाहीर झालेले राष्ट्रपती पदक प्रदान करण्यात आले. राज्यपालांनी मुंबई अग्निशमन दलाचे मुख्य अग्निशमन अधिकारी रवींद्र अंबुलगेकर, मुंबई अग्निशमन दलाचे उपमुख्य अग्निशमन अधिकारी दीपक घोष, सब ऑफिसर सुनिल गायकवाड, लिडींग फायरमन पराग दळवी, फायरमन तातु परब, पुणे महानगरपालिकेतील फायर इंजिन वाहनचालक करीमखान पठाण, सांगली-मिरज-कुपवाड शहर महानगरपालिकेतील फायरमन कसप्पा लक्ष्मण माने व पुणे महानगरपालिकेतील फायर अटेंडण्ट नरसिंहा पटेल यांना राष्ट्रपति पदक प्रदान केले.

अग्निशमन कार्यात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर तसेच ड्रोनचा वापर वाढविण्याबाबत अग्निशमन विभागाने गांभीर्याने विचार केला पाहिजे असे सांगताना दलाने अधिकारी व कर्मचाऱ्यांचे निरंतर कौशल्य वर्धन व प्रशिक्षण केले पाहिजे असे राज्यपालांनी सांगितले. मुंबईसारख्या महानगरांमध्ये गृहनिर्माण संस्थांना अग्नी सुरक्षेसंबंधी जनजागृती कार्यात सहभागी करून घेतले पाहिजे तसेच गृहनिर्माण संस्था व औद्योगिक आस्थापनांचे नियमित फायर ऑडिट झाले पाहिजे असे राज्यपालांनी सांगितले. अग्निशमन या विषयाचे सर्वंकष अध्ययन करण्यासाठी एक संशोधन संस्था निर्माण केली पाहिजे, अग्निशमन कार्यात नवनवे तंत्रज्ञान वापरले पाहिजे तसेच अग्निशमन कार्यासाठी पर्यावरण स्नेही अग्निरोधक विकसित केले पाहिजे असे राज्यपालांनी यावेळी सांगितले.

## तहव्वूर राणाच्या प्रत्यार्पणाने रहस्य उलगडण्याची शक्यता...

२६/११ च्या नृशंस दहशतवादी हल्ल्यानंतर या हल्ल्याचा सूत्रधार आणि मास्टरमाईंड तहव्वूर राणा याला अमेरिकेने भारताच्या हवाली केले आहे आणि तो भारतात आला आहे. त्याच्यावर खटला सुरू आहे आणि यानिमित्ताने पॅडोराज बॉक्सच खुला झाला आहे असे म्हणायला हवे. कारण या हल्ल्याच्या निमित्ताने आपल्याकडील सर्व विरोधी पक्षांचे खरेखोटे मुखवटे समोर येणार आहेत. त्यात काँग्रेस अर्थात केंद्रस्थानी आहे आणि सुशीलकुमार शिंदे, पी. चिदंबरम आणि पृथ्वीराज चव्हाण यांनी जो राग आळवायला सुरुवात केली आहे त्यावरून याची खात्री पटते की तहव्वूर राणा याच्या प्रत्यार्पणाने काँग्रेसची पोलखोल होणार आहे. म्हणून त्यांचा थयथयाट सुरू झाला आहे. मोदी सरकारने तहव्वूर राणाला आणले म्हणून मोदी सरकारला शाबासकी देणे तर दूरच राहिले, पण मोदी सरकारच्या एकूणच हेतूविषयक शंका घेण्यास सुरुवात झाली आहे. मुंबई दहशतवादी हल्ल्यातील सूत्रधार तहव्वूर राणा याला भारतात आणले जात असल्याने काँग्रेस अस्वस्थ होणे साहजिक आहे. काँग्रेसनेच आपल्या अजब धोरणामुळे या देशातील हिंदूना संपवण्याचा कट रचला होता आणि त्यासाठी काँग्रेसचे पी. चिदंबरम तसेच पृथ्वीराज चव्हाण यांनी भगवा दहशतवाद हा शब्द वापरला होता. आता त्याचा सर्वच पर्दाफाश होणार आहे म्हणून काँग्रेसच्या पायाखालची वाळू घसरली आहे. तहव्वूर राणाच्या आत्मसमर्पणाने आणि त्याला भारतात आणण्याने तपासात एक नाट्यपूर्ण घटना घडली आहे आणि त्यामुळे या तपासाला वेगळीच गती मिळणार आहे. पण काँग्रेसचे अस्वस्थ आत्मे त्यामुळे चवताळले आहेत कारण त्यांचा भगवा दहशतवाद हा नरेटिव्ह सेट करण्याचा डाव जो होता त्यामुळे तो उद्ध्वस्त होणार आहे.

तहव्वूर राणा याने पाकपुरस्कृत दहशतवाद्यांना कशी मदत केली आणि त्यामुळे तो कॅनडात राहून दहशतवाद्यांना कशी सर्व प्रकारची मदत पुरवत होता याचा पर्दाफाश झाला आहे. तहव्वूर राणा याच्यासमवेत त्याचा मित्र अमेरिकन डेव्हिड हेडली यांचे संबंध आता उघड झाले आहेत आणि त्यातील पाकिस्तानचा संबंध लपून राहिलेले नाही. पण तहव्वूर राणा याच्या साक्षीने हे सारे संबंध उघड होणार आहेत आणि याचमुळे काँग्रेसचे अस्वस्थ आत्मे अत्यवस्थ झाले आहेत. त्यामुळे त्यानी आतापासूनच तहव्वूर राणाला इतक्या वर्षांनी आताच का आणले असा प्रश्न विचारायला सुरुवात केली आहे. पण सरकारने एक चांगले काम केले आहे त्याचे कौतुक करणे तर सोडून द्या, पण तपासात कसा व्यत्यय आणता येईल ते पाहायचे ही काँग्रेसची नेहमीची चाल आहे. हेडली आणि तहव्वूर राणावर भारतात दहशतवादी हल्ले घडवून आणण्याचा डाव रचल्याचा आरोप आहे. आता पाकिस्तानने हे प्रकरण आपल्या अंगलट येऊ शकते हे जाणून तहव्वूर राणापासून अंतर राखण्याचे काम केले आहे. तेथील दैनिकांनी राणाशी पाकिस्तानचा काही संबंध नाही असे दावे करण्यास प्रारंभ केला आहे. पण पाकिस्तानची ही जुनीच सवय आहे. राणाला आपल्या हवाली करा असे विनंती पत्र भारताने पाकिस्तानला पूर्वीच पाठवले आहे. पण पाकिस्तानने त्यावर अद्यापही कारवाई केली नाही. पाकिस्तानी दहशतवादी यांना अमेरिकेने जागतिक दहशतवादी घोषित करू नये म्हणून पाकिस्ताने कसे अडथळे आणले आणि चीन त्यात कसा पाकिस्तानच्या वतीने वागला त्याचे भारताकडे पुरावे आहेत. त्यामुळे या प्रकरणात भारताला एकट्यालाच कारवाई करावी लागणार आहे हे निश्चित. आता राणा एनआयएच्या कस्टडीत आहे. त्याच्याविरूद्ध अनेक गुन्ह्यांचा आरोप आहे आणि त्यात प्रमुख गुन्हा आहे तो भारताविरूद्ध युद्ध पुकारणे. गुन्हेगारी कट रचणे भारतातील हल्ल्यांचे नियोजन अशा अनेक गुन्ह्यांचा त्याच्यावर आरोप आहे.

आता राणा त्यांना कसे सामोरे जातो हे पाहावे लागेल. पण त्याआधी काँग्रेसी पिल्लावळ जी राणाबद्दल गळे काढते आहे तिचा बंदोबस्त करावा लागेल. बाटला कांड प्रकरणात दहशतवादी मारले गेल्यानतर सोनिया गांधी यांनी गळे काढले होते. त्या काँग्रेसकडून या प्रकरणात चागले काही करेल किंवा सरकारला सहकार्य करेल याची अपेक्षा करणे मूर्खपणाचे होईल. त्यासाठी मोदी सरकारला स्वतःच पुढाकार घेऊन कारवाई करावी लागेल आणि राणाविरोधात कारवाई सुरू करावी लागेल. मुंबई हल्ल्यात जो २००८ साली झाला होता त्यात १६० हून अधिक भारतीय नागरिक ठार झाले होते. पण काँग्रेसची सहानुभूती नेहमीच दहशतवादी आणि त्यांच्या गटांशी राहिली होती. २०१४ साली मोदी सरकार आले आणि त्यामुळे काँग्रेसचे सरकार गेले. अन्यथा भगवा दहशतवाद ही संकल्पना आणखी रुजवण्यास काँग्रेसने सुरुवात केली होती आणि ती पूर्णत्वास गेली असती. पण भारताचे सुदैव असे की काँग्रेस सत्तेतून हद्दपार झाली आणि काँग्रेसचा हा नापाक डाव उद्ध्वस्त झाला. पण तरीही काँग्रेसचे आणखी काही नेते असे आहेत की ज्याना राणा भारतात आणल्याने फारच वाईट वाटले आहे. त्यामुळे त्यांना रडू आवरत नाही. राणाने लष्कर–ए–तोयबाच्या मदतीने, १२ समन्वित गोळीबार आणि बॉम्बस्फोट असे अनेक प्रकार भारतात त्या काळात केले. यात किती निरपराध नागरिक ठार झाले असतील याची कल्पना कुणालाही येणे शक्य नाही. कारण तेव्हा सरकार सारी माहिती दडवून ठेवत असे. राणाचा बालपणीचा मित्र डेव्हिड हेडली हा हल्ल्याच्या ठिकाणी देखरेख करण्यासाठी बनावट कव्हरची सुविधा दिली. हेडलीशी झालेल्या संभाषणात राणाने दहशतवादी हल्यांबाबत त्यांचे कौतुक केले असेही समजले आहे. काँग्रेसने आपले म्हणणं खरे करण्यासाठी विनाकारण संघाला यात गोवले आहे आणि संघी यांना दहशतवादी ठरवले होते. आता हे सर्वच प्रकरण खुले होईल आणि काँग्रेसची पोल खोल पुरती झाली आहे. आता काँग्रेसपासून लोकांनी सावध राहावे कारण आता सरकार जरी काँग्रेसचे नसले तरीही काही जण अजूनही काँग्रेसच्या विचारधारेशी संबंधित आहेत. त्यांचा मुकाबला करायला हवा. राणाच्या भारतात आणल्यानंतर पॅडोराज बॉक्स खुला झाला आहे हे मात्र निश्चित आहे.

# वक्फ सुधारणा : अल्पसंख्याकांच्या हिताचे

समाजातील विविध प्रश्न सोडवण्यासाठी सुधारणा करणारे कायदे महत्त्वाचे ठरतात. असे असताना संसदेच्या दोन्ही सभागृहात वक्फ दुरुस्ती विधेयक मंजूर झाल्याच्या घटनेची नोंद घ्यावी लागेल. समाजातील धार्मिक तसेच सांस्कृतिक घटकांमध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने टाकलेले हे एक पाऊल आहे. म्हणूनच या कायद्याचा इतिहास, बदलाची आवश्यकता आणि त्याच्या परिणामांचा सखोल विचार करणे आवश्यक ठरते. लेखाच्या सुरुवातीला लक्षात घ्यायला हवे की, वक्फ किंवा वक्फ बोर्ड ही संकल्पना भारतात स्वातंत्र्यपूर्व काळापासून अस्तित्वात आहे. मुघलांच्या आधीची सल्तनत 'दिल्ली सल्तनत' म्हणून ओळखली जाते. त्याद्वारे सर्वप्रथम भारतात वक्फची संकल्पना आली. मोईजुद्दीन घौर तेव्हाचे शासक होते. त्यांनी दोन गावे वक्फ म्हणून जामा मशिदीच्या संतांच्या हाती दिली. संकल्पना अशी की, कोणतीही चल वा अचल मालमत्ता धर्मकार्य, दान स्वरूपात आपण वक्फ म्हणून देऊ शकतो. पण कोणी ही मालमत्ता विकू शकत नाही, दुसऱ्याला भेट स्वरुपात देऊ शकत नाही. त्याची जन्मजात मालकी मिळू शकत नाही आणि ती गहाण ठेवू शकत नाही. या सगळ्या महत्त्वाच्या बाबी अत्यंत काटेकोरपणे पाळणे अपेक्षित होते.

इतिहासाचा धांडोळा घेतला तर 'लँग्वेजेस ऑफ पॉलिटिकल इस्लाम' या पुस्तकात अभ्यासक मुजफ्फर आलम म्हणतात की, इंग्रज येण्याआधी भारतात धर्मांतराशी वक्फचा जवळचा संबंध होता. म्हणजेच लोकांकडून दान, मदत म्हणून दिल्या जाणाऱ्या जमिनींचा वापर इस्लामेतर व्यक्तींचे धर्मांतर घडवून आणण्यासाठी मोठ्या प्रमाणावर केला गेला. पुढे रिचर्ड अर्टन यांचे पुस्तक आले. त्यांनी आपल्या 'ॲप्रोचेस टू स्टडी ऑफ कन्वर्जन टू इस्लाम इन इंडिया'नामक पुस्तकातही वक्फशी सुफी संतांचा जवळचा संबंध होता आणि याच्या साह्याने धर्मांतर केले जात असे, असे म्हटले आहे.

मुळातला वक्फ कायदा १९२३ चा होता. त्यानुसारच सगळ्या वक्फ मालमत्ता व्यवस्थापित होत असत. मात्र स्वातंत्र्यानंतर १९५४ मध्ये भारत सरकारने वक्फ ॲक्ट संमत केला आणि त्यातून वक्फच्या मालमत्तांचे प्रशासकीय अधिकार केंद्रीय पद्धतीने करण्याचा प्रयत्न केला. याच कायद्यांतर्गत वक्फ बोर्डाला अनेक अधिकारही दिले गेले. मात्र याविरुद्ध मोठ्या प्रमाणात नाराजी व्यक्त झाली. भारत सरकार यात का दखल देत आहे, असे म्हणत रोषही व्यक्त झाला. एकूणच वक्फ बोर्डाने सरकारी हस्तक्षेप अजिबात मंजूर केला नाही. या पार्श्वभूमीवर वक्फ सुधारणा विधेयक मंजूर होऊन आता हा कायदा लागू करण्यात आला आहे. त्या अंतर्गतही वक्फ बोर्डातील प्रशासकीय यंत्रणा, कारभार सुनियंत्रित करण्याचा विचार आहे. वक्फ बोर्डाच्या मॅनेजमेंटमध्ये सुधारणा करणे, हाच या दुरुस्तीमागील मुख्य हेतू आहे. याविषयी बोलताना गृहमंत्री अमित शहा यांनी अनेक मुद्द्यांना स्पर्श केला. वक्फ ही संकल्पना केवळ मुसलमानांसाठी लागू होते. असे असताना आधी मुस्लिमेतर समाजातील लोकांच्या जमिनीदेखील वक्फ बोर्ड हडपत




**वक्फ सुधारणा विधेयक मंजूर होऊन आता हा कायदा लागू करण्यात आला आहे. त्या अंतर्गत वक्फ बोर्डातील प्रशासकीय यंत्रणा, कारभार सुनियंत्रित करण्याचा विचार आहे. वक्फ बोर्डाच्या मॅनेजमेंटमध्ये सुधारणा करणे हाच या दुरुस्तीमागील मुख्य हेतू आहे. याविषयी बोलताना गृहमंत्र्यांनी अनेक मुद्द्यांना स्पर्श केला. त्याचाच हा धांडोळा आणि आगामी काळात दिसू शकणाऱ्या परिणामांची चर्चा.**

होते. त्यामुळेच शहा यांनी मुस्लिमेतर समाजाची मालमत्ता वक्फ बोर्डाच्या अंतर्गत येऊ शकत नाही, ही बाब स्पष्ट केली. त्यामुळेच पुढील काळात वक्फ बोर्डाने हडपलेल्या मुस्लिमेतर समाजाच्या मालमत्ता मूळ मालकांना परत मिळण्याची शक्यता वाढली आहे. मुळात इथे सरकारला मुस्लीम समूहाच्या धार्मिक बाबींमध्ये वा त्यांना मिळणाऱ्या देणग्यांमध्ये दखल देण्याची अजिबात इच्छा दिसत नाही. दुसरी बाब म्हणजे वक्फ बोर्डावर सरकार कोणत्याही मुस्लिमेतर व्यक्तीला बसवणार नाही. याखेरीज वक्फच्या कोणत्याही ऑफिसमध्ये मुस्लिमेतर व्यक्तीची नोंद करण्यात येणार नाही. प्रत्येकाला आपापल्या धर्माचे पालन करण्याचे पूर्व स्वातंत्र्य आहे. हे भारताच्या संविधानातच सांगितले आहे. मात्र एखाद्यामध्ये लालसा उत्पन्न करण्यासाठी, घाबरवण्यासाठी किंवा एखादा लाभ दाखवून धर्मांतर करण्यास भाग पाडणे आणि त्यासाठी वक्फच्या मालमत्तेचा गैरवापर करणे नियमबाह्य असल्याचे, सरकारने स्पष्ट केले आहे. केंद्रीय गृहमंत्र्यांनी हेदेखील स्पष्ट केले की, वक्फ बोर्डामधील को-खटले वा कोणत्याही प्रकारच्या तक्रारी न्यायालयापुढे गेल्या पाहिजेत. ते वक्फ न्यायाधिकरणात जाऊन चालणार नाही. कोर्टातच याचा सोक्षमोक्ष लागला पाहिजे. जमिनीचे रेकॉर्ड ठेवणे वा यांसारख्या गोष्टींसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे काही अधिकार आहेत. त्यामुळे वक्फ बोर्डातील काही अनानोंदी वा तक्रारींसंदर्भात जिल्हाधिकारीही लक्ष घालू शकतात. याचे कारण असे की, कर्नाटकमधील दत्तपीठ देवळाच्या जमिनीवर वक्फ बोर्डाने मालकी सांगितली आहे. इतकेच नव्हे तर, ख्रिश्चन समुदायाच्या अनेक मालमत्तांवरही त्यांनी दावा केला आहे. कब्जा करण्याचा प्रयत्न केला आहे. तेलंगणातील ६६ हजार कोटी रुपये किमतीच्या १७०० एकर जमिनीवरही वक्फ बोर्डाने कब्जा करण्याचा प्रयत्न केला. हे सर्व लक्षात घेता सरकारने उचललेले हे महत्त्वाचे पाऊल म्हणावे लागेल. यापुढेही वक्फ बोर्डाला देणगी देणारे, त्याचे नियमन करणारे पूर्वीच्याच पद्धतीने काम करतील. त्यात सरकार हस्तक्षेप करणार नाही. मात्र नियमनाच्या आणि गैरव्यवहार रोखण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकाऱ्यांची भूमिका महत्त्वाची राहील. एखादी जमीन खरेच वक्फची आहे की सरकारची आहे, हे जाणून घेण्याचे अधिकार या पदावरील व्यक्तीला मिळतील. शेवटी कोणत्याही जमिनीवरील हक्क वा मालकीची प्रकरणे जिल्हाधिकाऱ्यांच्या अधिकारक्षेत्रात येतात. तेव्हा आपण दुसरी पर्यायी यंत्रणा राबवू शकत नाही, असे केंद्र सरकारने यायोगे स्पष्ट केले आहे.

**आशय अभ्यंकर**
**प्रख्यात अभ्यासक**

दुसरी आणि सगळ्यात महत्त्वाची बाब म्हणजे अलीकडच्या या दुरुस्तीकडे एकटेपणाने नव्हे तर एकत्रितपणे बघायला हवे. म्हणजेच सीए (सिटिझनशीप अमेंडमेंट ॲक्ट), ट्रिपल तलाखशी संबंधित कायदा या सगळ्याद्वारे सरकार अल्पसंख्याकांचे रक्षण करण्याचा प्रयत्न करताना दिसते. कारण यामध्ये विधवा, अनाथ भरडले गेले आहेत. वक्फ बोर्डाने मालमत्ता हडपल्यामुळे काहींना प्रचंड त्रास सहन करावा लागला आहे. या लोकांना जाणीवपूर्वक मिळकतीपासून दूर ठेवण्यात आले आहे. त्यामुळेच ही दुरुस्ती अडचणीत आलेल्या अल्पसंख्याक समाजाला योग्य ती कायदेशीर मदत पुरवू शकेल, यात शंका नाही. वक्फ बोर्डाची कार्यपद्धती संविधानाने संमत असलेल्या मार्गावर असणे आणि धर्मनिरपेक्षतेच्या धोरणानुसार चालणे ही दोन्ही उद्दिष्ट्ये यात साधली गेली आहेत. प्रत्येक धर्माने आपापली आचरणपद्धत जपावी, हा धर्मनिरपेक्ष विचार आहे. त्यानुसार पारसी पंचायत आपापल्या जमिनी बघते. ख्रिश्चन लोक आपल्या जमिनींची देखभाल करतात. प्रशासकीय बाबी सांभाळतात. मात्र अन्य धर्मियांच्या संदर्भात कधीही हा वाद वा मुद्दा चर्चेत आलेला नाही. त्यामुळे वक्फ बोर्डाचे व्यवहारही यापुढे सुरळीत आणि अन्य धर्मियांच्या मालमत्तांवर डोळा ठेवून होणार नाहीत, अशी आशा वाटते.

जगभरातले इराण, इराक, सीरिया, टर्की यांसारखे अन्य मुस्लीम देश बघितले तर त्या प्रत्येक ठिकाणीही वक्फची कार्यपद्धती नियंत्रित करण्यासाठी केंद्रीय कायदे असल्याचे दिसते. तेथेही कोणत्याही एका बोर्डाला देणगी वा भेट स्वरूपात मिळालेली मालमत्ता सांभाळण्याचे वा त्याविषयीचे निर्णय घेण्याचे स्वायत्त अधिकार मिळत नाहीत. कारण असे अधिकार असणे कायदा-सुव्यवस्था आणि सुप्रशासनामध्ये बाधा आणणारी बाब आहे. म्हणूनच ताजी दुरुस्ती भारतातील यासंबंधीच्या कायद्यातील त्रुटी दूर करेल. वक्फ बोर्डाने अनेकांच्या जमिनी घेतल्या असून त्यातून लाखोंची मिळकत येत आहे. अशा प्रकारे अयोग्य पद्धतीने लाटलेल्या जमिनी मूळ मालकांना, त्यांच्या वारसांना परत मिळाल्या तर अनेकांना मोठी मदत होईल. तेव्हा मतपेटीकडे डोळा ठेवून मुस्लीम समुदायाला भ्रमित करण्याचा आरोप इथे होता कामा नये. इथे हेदेखील लक्षात घ्यायला हवे की, काँग्रेसचे सरकार असलेल्या २००६ च्या काळात जस्टीस सच्चर कमिटीचा रिपोर्ट आला होता. त्यामध्येदेखील वक्फच्या कार्यपद्धतीमध्ये बदल करण्याची आवश्यकता स्पष्टपणे मांडण्यात आली होती.

वक्फ बोर्डाकडे येणारी मिळकत त्यांच्या ताब्यात असणाऱ्या जमिनींच्या तुलनेत अत्यंत कमी असल्याचे समितीने निदर्शनास आणून दिले होते. समितीच्या माहितीप्रमाणे बोर्डाकडे असणाऱ्या मालमत्तेतून किमान बारा हजार कोटी रुपयांचा महसूल मिळणे अपेक्षित होते. प्रत्यक्षात मात्र त्याच्या एक-दोन टक्केही मिळकत नाही. म्हणूनच आता या सर्व त्रुटी दूर होतील आणि बोर्डाचा स्वच्छ कारभार अनुभवायला मिळेल अशी आशा वाटते.

# अन्न हे 'पूर्णब्रह्म'

अन्न, वस्त्र, निवारा या आपण प्राथमिक गरजा मानतो. अन्न ही जीवनावश्यक गोष्ट आहे. केवळ उदरभरण नाही तर चवीने खायला सर्वांनाच आवडते. आहार पूर्वीच्या काळी स्थानिक पदार्थांवर अवलंबून असे. ज्या प्रदेशात जी वस्तू उपलब्ध होते, तोच तिकडचा आहार होत असे. उदाहरणार्थ कोकणात भात, पंजाबमध्ये गहू रोटी, दक्षिणेकडे भात आणि नारळ याचा वापर जेवणात खूप होत असे, त्यामुळे आपल्या देशात खाद्यपदार्थांची खूपच व्हरायटी आपल्याला पाहायला मिळते. हळूहळू जग जवळ येत चाललं तसेच हे अन्नपदार्थ प्रत्येकाच्या ओळखीचे झाले. आज आपण पंजाबी, दक्षिण भारतीय, गुजराती,बंगाली सर्व प्रकारचे पदार्थ खाऊ शकतो. विशेषतः दक्षिण भारतीय आणि पंजाबी पदार्थांनी तर अन्न उद्योगांमध्ये आपल मोठे स्थान निर्माण केलं आहे. त्या प्रकारचं स्थान मात्र महाराष्ट्रीयन पदार्थ मिळवू शकले नाहीत. महाराष्ट्रीय पदार्थ तितकेच आकर्षक आहेत; परंतु कदाचित उद्योजक हा उद्योग सुरू ठेवण्यात मागे पडले असं वाटतं आणि हेच ज्यांच्या लक्षात आलं त्या जयंती कठाळे. त्यांच्या पूर्णब्रह्मची माहिती आज जाणून घेऊया.



जयंती कठाळे




जयंती यांचा जन्म विदर्भामध्ये एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. तिथेच त्यांनी इंजिनीयरिंग शिक्षण पूर्ण केलं आणि त्यांना बंगलोर येथे नोकरी मिळाली. त्यांचे पती सुद्धा इंजिनीयर असल्यामुळे त्यांनाही बंगलोरमध्ये नोकरी मिळाली आणि जयंती व त्यांचे पती बंगलोरमध्ये स्थायिक झाले. चांगल्या लठ्ठ पगाराची नोकरी असतानाही त्यांनी उद्योगाकडे वळायचं ठरवलं त्याला कारण घडल. त्यांचे पती नोकरीच्या निमित्ताने परदेशी बऱ्याच वेळा जात असत आणि त्या ठिकाणी त्यांना महाराष्ट्रीय पदार्थ खायला मिळत नसत तसंच पूर्ण शाकाहारी असल्यामुळे ही त्यांची खाण्याची अडचण होत असे. एकदा एका विमानात तर शाकाहारी अन्न उपलब्ध नसल्यामुळे त्यांना फळं आणि ब्रेड, बटरवर प्रवास करावा लागला होता. एकदा पती युरोपला गेले असताना त्यांनी त्यांना पत्र लिहिलं होतं आणि त्यात तुझ्या हातचा वरण-भात कधी मिळणार? असा प्रश्न विचारला होता. यातूनच जयंती कठाळे यांना प्रेरणा मिळाली आणि त्यांनी बंगलोरला सुरुवातीला घरगुती स्वरूपात आणि नंतर स्वतःच रेस्टॉरंट काढून महाराष्ट्रीय पदार्थांची चव सर्वत्र पोचवायचं ठरवलं.

त्यांची आजी नेहमी म्हणत असे की अन्न हे पूर्णब्रह्म आहे आणि म्हणूनच त्यानी त्यांच्या हॉटेलचं नाव ठेवलं 'पूर्णब्रह्म'. घरगुती वातावरण आणि स्वादिष्ट भोजन यामुळे लवकरच त्यांनी लोकप्रियता मिळवली. बिझनेस हा बिझनेससारखाच करायचा हे पहिल्यांदाच ठरवलं असल्यामुळे त्यांच्या रेस्टॉरंटमध्ये त्यांच्या स्वतःच्या मुलांना आणि नवऱ्याला ही बिल भरावं लागतं तसंच कर्मचाऱ्यांना उत्तम वागणूक द्यायची म्हणजे ते आपोआप ग्राहकांना उत्तम वागणूक देतील हेही ठरवलं. आज त्यांच्याकडे एकूण २५० कर्मचारी काम करतात आणि ते ग्राहक येण्यापूर्वी सकाळी ११ वाजताच जेवलेले असतात. कर्मचारी पोट भरलेले असतील तर ते ग्राहकांना प्रेमाने पोटभर जेवू घालतील हा त्या मागचा दुहेरी हेतू. रेस्टॉरंटमध्ये अगदी वरण-भातापासून पुरणपोळी, मोदक, मिसळपाव, वडापाव असे अस्सल महाराष्ट्रीय पदार्थ त्या उपलब्ध करून देतात. वरण-भात हा अतिशय साधा आणि सोपा पदार्थ वाटला तरी महाराष्ट्राच्या बाहेर गेल्यावर त्याचीही चव घ्यावीशी लोकांना वाटते. गरम गरम वरण भात आणि त्यावर साजूक तूप आणि लिंबू हा मेनू म्हणजे खरोखरच पूर्णब्रह्म आहे आणि तीच नेमकी कळ त्यानी शोधली आणि या सर्व घरगुती पदार्थांना देशातल्या अन्न उद्योगांमध्ये स्थान मिळवून दिलं. अर्थात सुरुवातीला त्यांना अनेक आव्हानांचा सामना करावा लागला; परंतु स्वतःच व्यवस्थापकीय कौशल्य, मेहनत आणि जिद्दीच्या बळावर त्यानी २०१२ पासून रेस्टॉरंट यशस्वीपणे चालवायला सुरुवात केली. जयंती यांना केवळ स्वादिष्ट भोजन द्यायचं नव्हतं तर महाराष्ट्रीय संस्कृती सुद्धा सर्वदूर पोचवायची होती. आज १४ देशांमध्ये पूर्णब्रह्मची आऊटलेट्स आहेत. जयंती कठाळे केवळ महाराष्ट्रीय अन्नपदार्थ सर्व दूर पोहोचवून थांबल्या नाहीयेत तर त्यांनी खूप वेगवेगळे यशस्वी प्रयोग देखील केले आहेत.



**सेवाव्रती**
**शिबानी जोशी**

महाराष्ट्रीय फूड म्हटलं तरी ते जिल्ह्याजिल्ह्यांत वेगवेगळ्या प्रकारचं असतं त्यासाठी त्यांनी जवळजवळ तीन वर्षे अन्नपदार्थांचा अभ्यास केला. सोलापूर, कोल्हापूर, पंढरपूरसारख्या ठिकाणी जाऊन तिथल्या स्थानिक पदार्थांची चव चाखली. जवळजवळ साडेसातशे मराठी पदार्थ शोधले आणि त्यातले १८५ पदार्थ त्या दररोज उपलब्ध करून देत आहेत. उद्योगाबरोबर एथिक्स ही त्यांनी जपले आहेत. कृत्रिम रंग, सोडा आणि प्रिझर्वेटिव्हसचा वापर त्या पदार्थात करत नाहीत. फक्त रेस्टॉरंट उघडून उपयोग होत नाही तर तिथलं वातावरण, तिथे संस्कृती, पाहुणचार आणि पदार्थांची चव हे सर्वच महत्त्वाचं ठरत. त्या प्रत्येक गोष्टीचा विचार पूर्णब्रह्म रेस्टॉरंटमध्ये केला जातो. अन्न हे खरोखरच पूर्णब्रह्म आहे, ते कधीही टाकून देऊ नये यासाठी जे ग्राहक ताटामध्ये एकही कण टाकत नाहीत त्यांना पूर्णब्रह्ममध्ये पाच टक्के सवलत दिली जाते आणि जे अन्न टाकून उठतात त्यांना दोन टक्के ज्यादा आकारणी केली जाते. इतकच काय तर रेस्टॉरंटमध्ये वाढदिवसासाठी आलेल्या ग्राहकांना केकवर मेणबत्ती विझवू दिली जात नाही तर आपल्या संस्कृतीनुसार त्यांचं औक्षण करून त्यांना पुरणपोळी विनामूल्य दिली जाते. जयंती कठाळे या केवळ पूर्णब्रह्मद्वारे महाराष्ट्रची संस्कृती पोहोचवत नाहीत तर त्या स्वतः तसाच पेहराव करतात. अगदी नऊवारी साडीमध्ये त्या विमानाने जगभरात यात्रा करतात. महाराष्ट्रीय अन्न संस्कृतीचा प्रसार केवळ एकट्याने होणारा नाही तर त्यासाठी अनेकांचे सहकार्य घेणे गरजेचे आहे, हे लक्षात आल्यावर त्यांनी फ्रेंचाईजेस देण्यास ठरवलं. 'पूर्णब्रह्म': ५,००० हे स्वप्न त्यांनी पाहिलंय. फ्रॅन्चायजीद्वारे जगभर मराठी पदार्थांचा झेंडा फडकवू शकेल, असे नेटवर्क होऊ घातलं आहे. स्त्री सक्षमी करण्याचं एक पाऊल म्हणून त्या शक्यतोवर महिलांनाच फ्रँचाईजी देतात. पुरुष असला तरी चालतो मात्र त्याच्याबरोबर एक महिला असणं गरजेचं असल्याचं तत्त्व त्यांनी पाळलं आहे. भारतामध्ये स्त्रियांना उद्योजक बनणं किती कठीण आहे असं विचारलं असता जयंती ताई म्हणाल्या की, भारत हा पुरुषप्रधान देश आहे. महिला जिद्दी असतात, त्यांना काहीतरी करण्याची उर्मी असते मात्र बऱ्याच वेळा समाज, कुटुंब तिला सहकार्य करत नाही. त्यामुळे स्त्रीनं अंतर्मनातूनच स्वतःला बदललं पाहिजे. यासाठी मी अनेक ठिकाणी कार्यशाळा घेते. महिला बचत गटांना ही मार्गदर्शन करते तसंच अगदी निवृत्त महिलांना सुद्धा प्रोत्साहन देते. महिलांमध्ये केवळ व्यापारी वृत्ती नाही तर भावनाही असतात आणि उद्योग-धंद्यात व्यापारी वृत्ती बरोबरच मूल्यांचं जतन गरजेचं असतं असं मला वाटतं. महाराष्ट्रात स्त्रियांमध्ये नाही तर पुरुषांमध्ये ही उद्योजकीय भाव कमी वाटतो. याविषयी विचारलं असता त्या म्हणाल्या की, मराठी घरात संस्कार, मोठ्यांचा आदर शिकवला जातो, त्याचबरोबर उद्योजकीय वृत्तीसुद्धा शिकायला हवी आणि त्याची सुरुवात स्वतःपासून करायला हवी.

उच्चशिक्षित असलेल्या जयंती यांनी नऊ ते सहा वेळेत होणारी लठ्ठ पगाराची नोकरी सोडून उद्योग सुरू केला, केवळ पैसा कमावणे हा उद्देश न ठेवता महाराष्ट्रीय पदार्थ सर्वत्र पोहोचवण्याचा वसा उचलला व महिलांना उद्योजकतेकडे वळवण्यासाठी त्यांना फ्रेंचायझी देणं सुरू केले. म्हणजेच उद्योगाबरोबर त्यानी सामाजिक बांधिलकी आणि मराठी संस्कृतीच वर्धन करण्याचं काम त्यातून पुढे नेलं आहे. धंद्यातून पैसे अनेक जण मिळवतात; परंतु त्यातून सामाजिक बांधिलकी आणि संस्कृती असे तिहेरी हेतू साध्य करत जयंती यांनी वैशिष्ट्यपूर्ण महिला उद्योजकामध्ये आपलं स्थान पक्क केलं आहे. नावातच जय असल्यामुळे पाच हजार फ्रँचायझीचं स्वप्न पूर्ण होऊन अंतिम जय जयंती कठाळे यांचा होणार हे नक्की.

joshishibani@yahoo. com

## कायद्याचा हात दाखविणे गरजेचे

दीनानाथ रुग्णालयात गर्भवती महिलेला उपचार नाकारल्यामुळे ओढवलेल्या मृत्यूच्या घटनेमुळे खासगी रुग्णालयांचा गरिबांचं हमखास शोषण करणारा कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. राज्यातील सरकारी इस्पितळातील प्रचंड गर्दी, अपुऱ्या सोयी-सुविधा, औषधांचा तुटवडा, न होणाऱ्या देखभालीमुळे नादुरुस्त वैद्यकीय उपकरणे आणि उपचार मिळण्यात होणारी जीवघेणी दिरंगाई यामुळे गरीब रुग्णांना नाईलाजास्तव ऐपत नसताना देखील खासगी रुग्णालयाची वाट धरावी लागते. या अगतिकतेचा फायदा उठविताना ही रुग्णालये शासकीय कायदा जुमानत नाहीत, सरकारी योजना धुडकावून लावतात तसेच लाखोंची अनामत रक्कम, ढीगभर औषधं, वेगवेगळ्या चाचण्या, एक्स रे यांचा भडीमार करून कुटुंबीयांना पार जेरीस आणतात. रुग्णाच्या नातेवाइकांना भोवळ येईल असं भलं मोठ्ठ बील हाती दिलं जातं! पेशंटचं काहीही होवो, पूर्ण पैसे भरल्याशिवाय सुटका नाही! रुग्णांवर उपचार करणं या कर्तव्यापासून ही रुग्णालये हात झटकून मोकळी होत असतील तर त्यांना कायद्याचा हात दाखविण्यात सरकारने कोणतीही कसूर ठेवू नये! प्रसंगी मान्यता रद्द करावी जेणेकरून माणुसकीशून्य प्रवृत्तीस आळा बसेल!

**- हेमंतकुमार मेस्त्री,** मनोर

## कुर्ला - वेळास नवीन बससेवा

भांडुप, दिवा, मुलुंड, ठाणे येथे नोकरी, व्यवसायानिमित्त मंडणगड तालुक्यातील शिपोळे, वेसवी, वाल्मिकीनगर, बाणकोट, वेळास व पंचक्रोशीतील चाकरमानी मोठ्या प्रमाणात आहेत. मात्र त्यांना वेळासपर्यंत जाण्यासाठी या मार्गावरुन गेली अनेक वर्षे थेट एसटी बसची सोय नव्हती. त्यामुळे मिळेल ती बस बदलत गाव गाठावे लागत असे. यात फरपट तर व्हायचीच पण पैसा जायचा, वेळेचा अपव्यय व्हायचा. सणासुदीला कुटुंबासह प्रवास करणे दिव्य असायचे. मात्र या भागात राहणाऱ्या मंडणगड तालुक्यातील रहिवाशांनी राज्य परिवहन महामंडळाकडे 'भांडुप-वेळास' बस सुरू करण्याबाबत निवेदन देताच परिवहन महामंडळाने 'कुर्ला नेहरुनगर-वेळास' ही बस सेवा १५ एप्रिलपासून सुरू करण्यात येत असल्याचे कळवले आहे. ही बस कुर्ला नेहरुनगर आगारातून सकाळी ७ वाजता सुटेल व भांडुप मधुबन गार्डन येथे ७.२३ ला येईल पुढे ठाणे सीबीएस, नेरुळ, कोकण भवन, कामोठे, पनवेल, गोरेगाव, आंबेत, मंडणगडमार्गे वेळासला जाईल व वेळासवरुन दुपारी २ वाजता परतीच्या प्रवासास निघेल. या मार्गावरील प्रवाशांनी या सेवेचा जरुर लाभ घ्यावा याचसाठी हा पत्रप्रपंच ! ही बस सुरू करण्यासाठी राज्य परिवहनमंत्री प्रताप सरनाईक, परिवहन महामंडळाचे अधिकारी, आमदार अशोक पाटील (भांडुप) व राजेंद्र पाटील (ठाणे) यांनी मोलाचे सहकार्य केले आहे त्याबद्दल अत्यंत आभारी आहोत.

**- दीपक लक्ष्मण घावटे,** भांडुप

जनसंवाद

## खासगी रुग्णालयांच्या नफेखोरीला चाप

एकूण आरोग्य सेवेचा आढावा घेतला, तर असे दिसून येते की जवळपास ८० टक्के आरोग्य सेवा ही खासगी व धर्मादाय रुग्णालये देतात व फक्त २० टक्के सरकारी रुग्णालये. फार मोठी रुग्ण संख्या, अपुरे मनुष्यबळ, खाटा उपलब्ध नसणे, औषधे उपलब्ध नसणे व स्वच्छतेचा अभाव या कारणांमुळे मध्यमवर्गीयांना खासगी रुग्णालयात किंवा धर्मादाय रुग्णालयात उपचार घेणे भाग पडते. इथे रुग्ण दाखल करताना डिपॉझिट भरावे लागते, जे अपेक्षित उपचार खर्चाच्या तुलनेत खूप जास्त असते. पण ते भरल्याशिवाय रुग्ण दाखल करून घेत नाहीत. आरोग्य विमा असल्यास कॉपी मागितली जाते. त्यावरून रुग्णाकडून किती पैसे काढता येतील याचा अंदाज घेऊन नको त्या चाचण्या करावयास लावून बिल फुगवले जाते. नियोजित शस्त्रक्रियेसाठी रुग्ण दाखल करताना सर्वसाधारण किंवा मध्यम वॉर्डमध्ये खाटा उपलब्ध नसल्याचे कारण सांगून स्पेशल रूम घेण्यास भाग पाडले जाते. इथे सर्व सेवा जास्त दराने पुरवल्या जातात. गरज नसताना डाएटीशियन, फिजिओथेरापीस्ट इत्यादी सेवा पुरवून बिल फुगवले जाते. रुग्णालयाच्या केमिस्ट शॉपमधूनच औषधे खरेदी करावी लागतात व ते डिस्काउंट देत नाहीत जे इतरत्र मिळते. गरज नसताना ग्लोव्हज, बँडेज, कॉटन इत्यादी साहित्य विकत घेण्यास सांगितले जाते जो खर्च विमा कंपनी भरून देत नाही. पेशंटला डिसचार्ज देण्यात वेळ लावून एक दिवस अधिकचा चार्ज मारला जातो. हे सर्व रुग्णालय व डॉक्टर्स यांची मिलीभगत असल्याने होत असते. धर्मादाय चॅरिटी रुग्णालसाठी सरकारकडून फुकट भूखंड मिळवून, विविध कर सवलती मिळवून धर्मादाय रुग्णालये अफाट पैसा कमावतात व १० टक्के खाटा गरीब रुग्णांसाठी नावापुरत्या राखीव ठेवल्या तरी तेथे रुग्ण ॲडमिट करण्यास टंगळमंगळ करतात. सरकारने खासगी व धर्मादाय रुग्णालयांच्या नफेखोरीला चाप लावावा.

**- बकुल बोरकर,** विलेपार्ले, मुंबई

## राशिभविष्य

मंगळवार,१५ एप्रिल २०२५

**|| पंचांग ||**

शके १९४७. चंद्र नक्षत्र उत्तरा. योग ध्रुव. नंतर व्याघात. चंद्र राशी कन्या. भारतीय सौर २५ चैत्र शके १९४७. मंगळवार दिनांक १५ एप्रिल २०२५. मुंबईचा सूर्योदय ०६.२१, मुंबईचा चंद्रोदय ०५.४२, मुंबईचा सूर्यास्त ०६.५५, मुंबईचा चंद्रास्त ०६.०० राहूकाळ ११.०४ ते १२.३८.श्री श्रीधर स्वामी पुण्यतिथी.

**|| भविष्य ||**

**मेष** : आपल्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव पडेल.

**वृषभ** : रखडलेली कामे गतीमान होतील.

**मिथुन** : बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल.

**कर्क** : अपेक्षित गोष्टी साध्य होतील.

**सिंह** : कामे यशस्वीपणे पूर्ण करू शकाल.

**कन्या** : कामात यश संभवते.

**तूळ** : आर्थिक परिस्थिती उत्तम राहील.

**वृश्चिक** : देवदर्शनाचे बेत साध्य होतील.

**धनू** : कामात अडथळे येण्याची शक्यता.

**मकर** : कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल.

**कुंभ** : तांत्रिक शिक्षण घेणाऱ्यांना दिवस उत्तम राहील.

**मीन** : मनातील इच्छा पूर्ण करण्यात यश मिळेल.

दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा...
पुण्यभूमी



## "घर घर संविधान" उपक्रमाला सुरुवात

**भिवंडी :** मीरा-भाईंदर शहरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली. संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे स्मरण करत, मीरा-भाईंदर महानगरपालिकेत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. सकाळी ९ वा. मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद शर्मा यांच्या शुभ हस्ते काशिमिरा येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ स्मारकास पुष्पहार अर्पण करून मानवंदना देण्यात आली. त्यानंतर सकाळी भाईंदर पश्चिम येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धाकृती पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करण्यात आले. त्यानंतर मुख्य कार्यालयाच्या दुसऱ्या मजल्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस महापालिकेच्या आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त, अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी 'घर घर संविधान' यावर्षी भारतीय संविधानाचा अमृत महोत्सव साजरा होत असून, त्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाच्या सूचनेनुसार "घर घर संविधान" हा जनजागृतीपर उपक्रम मीरा-भाईंदर महानगरपालिकेत राबविण्यात येणार आहे.

# भिवंडी-निजामपूर पालिकेतर्फे नागरिकांसाठी विशेष सुविधा

### एकाच QR Code मध्ये होणार विविध सुविधा उपलब्ध

◆ **भिवंडी (प्रतिनिधी):**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेचे प्रशासक तथा आयुक्त यांनी सन २०२५-२६ चा अर्थसंकल्प सादर करताना प्रशासनाच्या कामकाजाच्या दृष्टिकोनातून पारदर्शक व गतीमान प्रशासन राबविण्यात येईल असे आश्वासन दिले होते. त्याचदृष्टीने महानगरपालिकेने एक पाऊल पुढे टाकले आहे. दिनांक ११ एप्रिल २०२५ रोजी महानगरपालिकेमार्फत शहरातील नागरिकांना कर भरणा करणे, सेवा हमी कायद्यानुसार एखाद्या सेवेकरिता अर्ज करणे व घरबसल्या तक्रार करण्यासाठी तसेच तक्रार कोणत्या कार्यालयात प्रलंबित आहे याचा आढावा घेण्यासाठी सामायिक क्युआर कोड तयार करुन त्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

महानगरपालिकेच्या संगणक विभागामार्फत सोमवारी १०० दिवस कृती आराखडा कार्यक्रमांतर्गत सुकर जीवनमान या शिर्षकाखाली नागरिकांच्या सुविधेकरिता QR Code प्रणाली निर्माण करण्यात आली आहे. त्यानुसार महानगरपालिकेमार्फत प्रसिद्ध करण्यात आलेले क्युआर कोड स्टिकर हे महानगरपालिकेच्या सर्व कार्यालयाबाहेर चिकटवण्यात येतील. या QR Codeद्वारे नागरिकांना कर भरणा करता येईल, शासनाने अधिसूचीत केलेल्या ७० सेवांसाठी अर्ज करणे व तक्रार निवारण होत नसल्यास घरबसल्या तक्रार करणे तसेच केलेली तक्रार कोणत्या कार्यालयात प्रलंबित आहे याचा आढावा घेणे. नागरीकांनी सदरचे क्युआर कोड स्कॅन करुन जर सेवेबद्दल तक्रार करावयाची असल्यास आधी स्वतःची केवळ एकदाच नोंदणी करावयाची आहे. यामुळे नागरिकांना शासकीय कार्यालयात फेऱ्या मारण्याची गरज रहाणार नाही. तसेच तक्रारदाराने केलेल्या तक्रारीचा पाठपुरावा देखील होणार असून, जर संबंधित अधिकाऱ्याने ७ दिवसात तक्रार निकाली काढली नाही तर सदरची तक्रार आज्ञाप्रणालीमार्फत वरिष्ठ अधिकाऱ्याकडे वर्ग होईल. याबाबत आयुक्त महोदय हे स्वतः प्रत्येक आठवड्याला आढावा घेणार असून ज्या अधिकाऱ्याकडे १ महिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी तक्रार प्रलंबित असेल, त्यांचेवर कारवाई प्रस्तावित केली जाईल असे सुतोवाच मा. आयुक्त महोदयांनी केले आहे. तसेच, नागरिकांनी या वरील QR CODE सेवेचा मोठ्या प्रमाणात लाभ घ्यावा असे आवाहन मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अनमोल सागर यांनी केले आहे. या प्रसंगी मा. अतिरिक्त आयुक्त (१) देविदास पवार, मा. अतिरीक्त आयुक्त (२) विठ्ठल डाके, मा. उपायुक्त (मुख्यालय) रोहिदास दोरकुळकर, मा. उपायुक्त (समाजकल्याण) विक्रम दराडे, मा. उपायुक्त (कर) बाळकृष्ण क्षिरसागर, मा. सहायक आयुक्त (आरोग्य) शैलेश दोंदे, मा. सहाय्यक आयुक्त (प्रशासन) डॉ. अनुराधा बाबर आणि महानगरपालिकेचे सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## मंत्री
## क...
## राज्यभर उभारणार



◆ **कल्याण (प्रतिनिधी) :**

**कल्याण पूर्वेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाचे दिमाखदार लोकार्पण**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार जनसामान्यांमध्ये पोहोचवण्याचे महत्वाचे कार्य कल्याण येथे उभारण्यात आलेल्या ज्ञानकेंद्रांच्या माध्यमातून खासदार डॉ. श्रीकांत शिंदे करत आहेत. अशी ज्ञान केंद्रे संपूर्ण राज्यात उभारली जातील, अशी घोषणा राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत आणि सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांनी कल्याण येथे केली. कल्याण पूर्वेत खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या प्रयत्नातून उभारण्यात आलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्ञान केंद्राचे लोकार्पण सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. रविवारी कल्याण पूर्वेतील ड प्रभाग समिती कार्यालयाच्या आवारात झालेल्या दिमाखदार सोहळ्यात देशातील आगळ्यावेगळ्या ज्ञान केंद्राचे लोकार्पण झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जीवनपट होलोग्राफी, विविध माहितीपटाच्या माध्यमातून येथे उलगडण्यात आला आहे. शेकडो पुस्तकांचे ग्रंथालयही यात आहे.

या दिमाखदार सोहळ्यात शेकडोच्या संख्येने भीम बांधव उपस्थित होते. तसेच याप्रसंगी कल्याण पूर्वच्या आमदार सुलभा गायकवाड, कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे आण्णा रोकडे, कल्याण डोंबिवली महापालिकेचे आयुक्त अभिनव गोयल, शिवसेनेचे कल्याण जिल्हाध्यक्ष गोपाळ लांडगे, अरविंद मोरे, निलेश शिंदे, प्रशांत काळे यांसह शिवसेना, भाजपचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनप्रवास, त्यांचे साहित्य, त्यांची आंदोलने आणि विचार होलोग्राफीसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अनुभवण्याची संधी आता कल्याणकरांना मिळणार आहे. कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या ड प्रभाग कार्यालयाशेजारी उभारण्यात आलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकातील ज्ञानकेंद्राचे लोकार्पण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला १३ एप्रिल रोजी राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत आणि सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांच्या हस्ते झाले. यावेळी दृकश्राव्य माध्यमातून संवाद साधताना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी या स्मारकाचा प्रवास उलगडून सांगितला. स्थानिकांची मागणी होती त्यानुसार हे स्मारक उभे राहिले. यात संघर्ष समितीपासून अनेकांचे योगदान आहे, असे यावेळी डॉ. श्रीकांत शिंदे म्हणाले. या स्मारकासाठी प्रयत्न करणाऱ्या आणि पाठबळ देणाऱ्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचेही डॉ. शिंदे यांनी आभार मानले.

नागरिकांच्या मागणीनुसार आणि वेगळ्या संकल्पना अमलात आणण्यासाठी इच्छाशक्ती लागते, ती इच्छाशक्ती खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्याकडे आहे, असे गौरवोद्गार सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांनी यावेळी काढले. या स्मारकाची कॉपी आम्हीही करणार. राज्यभर असे ज्ञान केंद्र उभारणार अशी घोषणा यावेळी मंत्री संजय शिरसाठ यांनी केली. तर बाबासाहेबांचे विचार जनसामान्यांमध्ये पोहोचवण्याचे काम खासदार डॉ. श्रीकांत शिंदे करत आहेत. ही संकल्पनाच खूप मोठी आहे. त्यामुळे असे ज्ञानकेंद्र संपूर्ण राज्यात उभे करायला हवेत, असे मत यावेळी उद्योग मंत्री उदय सामंत यांनी केले. या ज्ञान केंद्राची प्रतिकृती आम्हीही साकारणार असेही यावेळी सामंत म्हणाले.

## वेचक

### अंबरनाथ नगरपालिकेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात

**अंबरनाथ :** अंबरनाथ नगरपालिकेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी निर्मिती करताना भविष्याचा विचार केला. वेगवेगळ्या देशांच्या घटना त्यांनी तपासल्या आणि बंधुता ही मानवतेची आद्य तीन तत्त्वे समाविष्ट असणारी घटना दिली. अंबरनाथ नगरपालिकेचे मुख्याधिकारी उमाकांत गायकवाड यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. सदर कार्यक्रमास उपमुख्य अधिकारी उमेश राऊत तसेच सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



### भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी



**भिवंडी :** सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रकान्वये आणि महानगरपालिकेचे मा. प्रशासक तथा आयुक्त अनमोल सागर यांचे निर्देशानुसार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची महानगरपालिका मुख्यालयात मा. प्रशासक तथा आयुक्त अनमोल सागर यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन त्यांना अभिवादन केले. यावेळी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. यानंतर महानगरपालिकेच्या प्रांगणातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. महानगरपालिकेच्या जुन्या इमारतीजवळील अर्ध पुतळ्यास मा. उपायुक्त बाळकृष्ण क्षीरसागर व उपायुक्त विक्रम दराडे यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी डॉ. अनुराधा बाबर, मा. सहायक आयुक्त, शैलेश दोंदे, मा. सहायक आयुक्त, नितीन पाटील, मा. सहायक आयुक्त, तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्सव समितीचे स्वागताध्यक्ष व कार्यकारी सल्लागार विकास निकम, जयंती समिती अध्यक्ष लक्ष्मण गायकवाड, महानगरपालिकेचे नियंत्रण अधिकारी, विभागप्रमुख, कर्मचारी, जयंती समितीचे पदाधिकारी उपस्थीत होते.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जयंती दिन महापालिकेत उत्साहात साजरा

**डोंबिवली :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४व्या जयंतीदिना निमित्त महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी महापालिका मुख्यालयात डॉ. बाबासाहेबांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. कल्याण पश्चिमेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानातील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासही आयुक्त अभिनव गोयल यांनी पुष्पहार अर्पण केले. यावेळी माजी महापौर रमेश जाधव, उपआयुक्त अवधुत तावडे, कार्यकारी अभियंता अशोक घोडे, सहा.आयुक्त धनंजय थोरात, राजेश सावंत, माहिती व जनसंपर्क अधिकारी माधवी पोफळे, शिक्षणाधिकारी विजय सरकटे, ३/क प्रभाग अधीक्षक ज्ञानेश्वर कंखरे, सुरक्षा अधिकारी भरत बुळे, सहा. सुरक्षा अधिकारी सुरेश पवार तसेच इतर अधिकारी/कर्मचारी तसेच नागरिकांनी डॉ. बाबासाहेबांच्या पुतळ्यास पुष्पसुमने वाहून अभिवादन केले. महापालिकेच्या डोंबिवली परिमंडळ-२चे उपायुक्त रमेश मिसाळ यांनी जुन्या विभागीय कार्यालयाजवळील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास आणि फ प्रभाग कार्यालयातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैलचित्रास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी कार्यकारी अभियंता मनोज सांगळे, सहा.आयुक्त हेमा मुंबरकर, संजयकुमार कुमावत, ६/फ प्रभागाचे अधिक्षक जयवंत चौधरी, स्वच्छता अधिकारी शरद पांढरे तसेच इतर अधिकारी/ कर्मचारी उपस्थित होते. कल्याण पूर्व येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज प्रभाग क्षेत्र कार्यालय परिसरात (ड प्रभाग) असलेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उप आयुक्त अतुल पाटील, सहा.आयुक्त उमेश यमगर, ५/ड प्रभागाचे अधीक्षक मधुकर भोये त्याचप्रमाणे इतर अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.



### शाळा, महाविद्यालयात विविध उपक्रमांचे आयोजन

**कल्याण :** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती दिनाचे औचित्य साधून, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाने उपायुक्त संजय जाधव, प्रशासन अधिकारी रमेश चव्हाण आणि शिक्षणाधिकारी विजय सरकटे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध शाळा, महाविद्यालयामध्ये विविध उपक्रमांचे आयोजन केले. यामध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याशी संबंधित विषयांवर परिसंवाद, त्यांच्या विचारधारांवर ग्रंथोत्सव, ग्रंथ प्रदर्शन, निबंध स्पर्धा, चित्रकला, वाचनाभिवादन तसेच त्यांच्या कार्याशी संबंधित इतर नाविन्यपूर्ण उपक्रम आयोजित करण्यात आले.

### ठाण्यात तब्बल ५०९ बांगलादेशींना अटक

**ठाणे :** अभिनेता सैफ अली खान याच्यावर मुंबईतील घरात एका बांगलादेशीने हल्ला केल्याची घटना अलीकडेच घडली. त्यानंतर बांगलादेशींवरील कारवाई मुंबई आणि ठाण्यात तीव्र झाली. कारवाईची धार अलीकडेच तीव्र झाली असली तरी गेल्या दहा वर्षांत ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या क्षेत्रात तब्बल ५०९ बांगलादेशींवर कारवाई झाली. ठाण्यातील अनेक बांधकामांच्या ठिकाणी बांगलादेशी पुरुष मजूर म्हणून काम करतात, तर महिला बारमध्ये गायक किंवा वेट्रेस म्हणून काम करतात.

## ...अखेर गटारात भांडे ठेऊन पाणी भरण्यापासून मुक्तता

◆ **भाईंदर(वार्ताहर) :**



प्रहार इम्पॅक्ट

संक्रमण शिबिरातील नागरिकांना गटारात भांडे ठेऊन पिण्याचे पाणी भरावे लागत असल्याने याबाबतचे सविस्तर वृत्त १३ एप्रिलच्या दैनिक प्रहारमध्ये गटारात भांडे ठेऊन भरावे लागत आहे. पिण्याचे पाणी या मथळ्याखाली प्रसिद्ध होताच पालिका प्रशासनाने त्याची त्वरित दखल घेत रस्त्याला समांतर असलेल्या जलवाहिनी बदलण्याचे काम सुरू केले आहे.

काशिमीरा, जनता नगर भागातील झोपडपट्टी हटवून त्या ठिकाणी केंद्र व राज्य सरकारच्या संयुक्तरित्या बीएसयूपी योजना राबविण्यात येत असल्याने तेथील रहिवाशांना १३ वर्षांपूर्वी सिल्वर सरिता आणि आरटीओ संक्रमण शिबिरातील स्थलांतरित करण्यात आले होते. नव्याने रस्ता तयार करताना या भागातील महापालिका जलवाहिनीचे नळ जमिनीला समांतर झाल्यामुळे टाकीत किंवा भांड्यात पाणी चढत नसल्याने रहिवाश्यांना भांडे गटारात ठेऊन पिण्याचे पाणी भरावे लागते.

याबाबतचे सविस्तर वृत्त प्रहार मध्ये प्रसिद्ध होताच प्रशासनाने त्याची दखल घेत रस्त्याला समांतर असलेल्या जलवाहिनी बदलण्याचे काम सुरू केले आहे. तक्रारदार महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उप विभाग अध्यक्ष करण हरिजन यांनी प्रहारचे आभार व्यक्त केले आहेत.

## ठाणे महापालिकेतर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात

◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**



(छाया : अशोक घाग)

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४वी जयंती ठाणे शहरात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. ठाणे महापालिकेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या अभिवादन कार्यक्रमात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कोर्ट नाका येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यांच्यासह खासदार नरेश म्हस्के, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे आणि महापालिका आयुक्त सौरभ राव यांनीही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

कोर्टनाका येथे झालेल्या कार्यक्रमास माजी खासदार आनंद परांजपे, माजी महापौर संजय मोरे, माजी नगरसेवक पवन कदम, उपायुक्त जी. जी. गोदेपुरे, उपायुक्त शंकर पाटोळे यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यापूर्वी, ठाणे महापालिकेच्या वतीने ठाणे रेल्वे स्थानक येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी, उपायुक्त उमेश बिरारी, उपायुक्त शंकर पाटोळे, सहाय्यक आयुक्त सोपान भाईक आदी उपस्थित होते. दरम्यान, ठाणे महापालिका मुख्यालयातील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृह येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. त्याप्रसंगी, उपायुक्त उमेश बिरारी, माहिती व जनसंपर्क अधिकारी रवींद्र मांजरेकर, उप माहिती व जनसंपर्क अधिकारी प्राची डिंगणकर यांच्यासह ठाणे महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक उपस्थित होते.

## ठाण्यात 'संविधान गौरव यात्रा' उत्साहात

◆ **ठाणे ( प्रतिनिधी) :**



ठाण्याचे आमदार संजय केळकर यांच्या पुढाकारने आणि भारतीय जनता पार्टी ठाणे शहर जिल्ह्यातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त व भारतीय संविधान अमृत महोत्सव वर्षानिमित्त ठाण्यात भव्य संविधान गौरव यात्रा काढण्यात आली. भाजपा खोपट कार्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तसबीरीला पुष्पहार घालून भन्ते यांच्या उपस्थितीत वंदना घेऊन रॅलीस सुरुवात झाली. आंबेडकर रोड, कोर्ट नाका येथील संविधान चौक, डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळा व पुढे बाजारपेठेतून स्टेशन येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याजवळ रॅली समाप्त झाली.

या रॅलीत आमदार निरंजन डावखरे, भाजपा ठाणे शहर जिल्हा अध्यक्ष संजय वाघुले, बौद्ध धर्मगुरू, भन्ते, माजी नगरसेवक संदीप लेले, नारायण पवार, भरत चव्हाण, मृणाल पेंडसे, सुरेश कांबळे, युवा मोर्चा अध्यक्ष सुरज दळवी, सचिन पाटील, राजेश गाडे, विशाल वाघ, कृपाल कांबळे, प्रदीप जाधव व असंख्य भीमसैनिक व कार्यकर्ते सहभागी झाले होते. ही रॅली मोठ्या उत्साहत पार पडली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयघोषाने वातावरण भीममय झाले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोडवर उपस्थित नागरिकांनी रॅलीचे जोरदार स्वागत केले. या ठिकाणी जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमला आ. केळकर, आ. डावखरे यांनी भेट देऊन नागरिकांना शुभेच्छा दिल्या. पुढे कोर्ट नाका येथील अशोक स्तंभ येथे असलेल्या संविधान प्रतिमेस आ. केळकर, आ. डावखरे, संजय वाघुले व उपस्थित पदाधिकाऱ्यांनी पुष्पसृष्टी करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाचा जय जयकार करून पुढे डॉ. बाबासाहेबांच्या पुतळ्यास पुष्पहार घातला. बाजारपेठेतून रॅली जात असताना दुकानदारांनी रॅलीवर व बाबासाहेबांच्या तसबीरीवर फुलांचा वार्षाव केला. स्टेशन रोडवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यास मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार घालून रॅलीचा समरोप करण्यात आला.

### ठाणे महापालिका क्षेत्रात अग्निशमन सेवा सप्ताहास आरंभ

◆ **ठाणे ( प्रतिनिधी) :**

अग्निशमन दिनाच्या निमित्ताने ठाणे महापालिकेच्या अग्निशमन दलाने सेवा सप्ताह आयोजित केला आहे. या सप्ताहाचा आरंभ शहीद जवानांना श्रद्धांजली वाहून सोमवारी सकाळी करण्यात आला. त्या निमित्ताने ठाणे महापालिकेचे आयुक्त सौरभ राव यांनी बाळकूम अग्निशमन केंद्र येथे शहीद स्तंभाला अभिवादन केले. याप्रसंगी ठाणे महापालिकेचे उपायुक्त उमेश बिरारी,



उपायुक्त (अग्निशमन विभाग) दिनेश तायडे, उपायुक्त शंकर पाटोळे, अग्निशमन दलाचे प्रमुख गिरीश झळके, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यासिन

**आयुक्त सौरभ राव यांनी वाहिली शहिदांना श्रद्धांजली**

तडवी आदी उपस्थित होते. याच वेळी, महाराष्ट्र फायर सर्व्हीस असोसिएशनच्या देणगी पेटीचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. १४ एप्रिल, १९४४ रोजी मुंबई बंदरात उभ्या असलेल्या बोटीतील दारूगोळ्याने अचानक पेट घेतला. त्याठिकाणी उसळलेल्या भीषण आगीशी झुंज देत असताना झालेल्या भीषण स्फोटामुळे मुंबई अग्निशमन दलाचे ६६ अधिकारी आणि जवान शहीद झाले होते. त्यांच्या स्मरणार्थ अग्निशमन दिन साजरा केला जातो.

त्यानिमित्ताने, १४ ते २० एप्रिल या काळात ठाणे अग्निशमन दलातर्फे महापालिका क्षेत्रात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यात, विविध आस्थापना, सोसायटी येथे अग्निसुरक्षेबाबतची प्रात्यक्षिके करण्यात येणार आहेत.

### आमदार विश्वनाथ भोईर यांच्या प्रयत्नाने अमृत - २ योजनेतून निधी मंजूर

## उंबर्डे तलावाच्या सुशोभीकरणामुळे गावाच्या सौंदर्यात भर पडणार

◆ **कल्याण(प्रतिनिधी) :**



अमृत-२ योजने अंतर्गत कल्याण पश्चिमेतील उंबर्डे येथील तलाव शुशोभीकरण (पुनरूज्जीवन) करणे कामाचे भूमिपूजन कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघाचे आमदार विश्वनाथ भोईर यांच्या हस्ते नुकतेच संपन्न झाले. या उंबर्डे तलावाच्या सुशोभीकरणामुळे उंबर्डे गावाच्या सौंदर्यात भर पडणार असल्याचे मत यावेळेस आमदार विश्वनाथ भोईर यांनी व्यक्त केले. आमदार भोईर यांनी शासनाकडे पाठपुरावा करून तलाव सुशोभीकरणासाठी सात कोटी रुपये मंजूर करून आणले आहेत. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते श्रीफळ वाढवुन सुशोभीकरण कामाचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी आमदार विश्वनाथ भोईर यांनी सांगितले की, कल्याण पश्चिम मतदार संघात अनेक जुने तलाव आहेत, त्यांची डागडुजी व सुशोभीकरण करणे आवश्यक आहे. नाहीतर तलाव नाहीसे होतील, म्हणून शासनाकडे पाठपुरावा करून कल्याण पश्चिम भागातील सुरूवातीला पाच तलावांच्या सुशोभीकरणासाठी निधी मंजूर करून घेतला आहे. त्यातील आधारवाडी येथील तलावाच्या सुशोभीकरणाचे काम सुरू आहे, तर आता उंबर्डे गावातील जुन्या तलावाच्या सुशोभीकरण कामाला सुरुवात केली असल्याचे सांगितले.

यावेळी माजी नगरसेवक जयवंत भोईर, प्रभुनाथ भोईर, वैशाली भोईर, पुष्पा भोईर, युवासेनेचे जिल्हा चिटणीस वैभव भोईर, परिवहन सदस्य सुनील खारुक, राष्ट्रपती पुरस्कार विजेते अशोक भोईर, छत्रपती पुरस्कार विजेते चैनु लोखंडे, भाजपचे ओबीसी सेल शहर अध्यक्ष शत्रुघ्न भोईर, समाजसेवक नंदु शेलार, रामदास कारभारी, गणेश कारभारी, दीपक पाटील, यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### रिक्षाचालकाने सापडलेला मोबाईल केला परत

**ठाणे :** ठाण्यातील सिव्हिल हॉस्पिटल परिसरात ज्ञानेश्वर कोल्हे यांचा मोबाईल फोन गहाळ झाला. फोन हरवल्याचे लक्षात येताच कोल्हे यांनी त्यांच्या नंबरवर संपर्क करण्याचा पर्यंत केला मात्र त्यावर उत्तर आले नाही. काही वेळानंतर पुन्हा एकदा कॉल केल्यानंतर समोरून मी इम्रान बेपारी बोलत आहे, मी रिक्षाचालक असून आपला फोन मला सापडला असून माझ्याकडे सुरक्षित असल्याचे सांगितले. त्यानंतर पुढच्या तासाभरात ठाणे स्थानकाजवळ मारुती मंदिर रिक्षा स्टँड येथे प्रत्यक्ष भेटून रिक्षाचालक इम्रान यांनी ज्ञानेश्वर कोल्हे यांचा फोन परत केला. यावेळी रिक्षा संघटनेचे अध्यक्ष राजू सावंत हे देखील उपस्थित होते.

## मुरबाड तालुक्यात वादळी वाऱ्यासह गारपीट पाऊस

### कौले, पत्रे, छप्पर उडून शेतकऱ्यांचे नुकसान

◆ **मुरबाड (प्रतिनिधी) :**



मुरबाड तालुक्यात रविवारी (दि. १३) सायंकाळी ५ ते ६.३० या कालावधीत सावरणे, मोरोशी, टोकावडे, उमरोली या विभागात वादळी वाऱ्यासह झालेल्या अतिवृष्टीमुळे या संपूर्ण परिसरातील, अनेक वृक्ष, विजेचे खांब उन्मळून पडले. अनेक घरावरील कौले, पत्रे, छप्पर उडून खूप मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचे नुकसान झाले.

जवळपास या परिसरात दीड तास पाऊस पडत होता. त्यामुळे उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना काही प्रमाणात गारव्याच दिलासा मिळाला. मात्र अवकाळी पावसाने टोकावडे व धसई परिसरात मोठा फटका बसल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यातच परिसरात घरून धसईकडे जात असताना रवीना सांडे (वय १८) या तरुणीवर वीज पडून या तरुणीचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. सोबत वडील राजाराम सांडे होते. अचानक आलेल्या पाऊस व वादळ वाऱ्याने महाराष्ट्र मिलिटरी स्कूल या शाळेवरील इमारतीचे संपूर्ण छत उडून गेले असून खूप मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

# गरिबांच्या जमिनी खाजगी कंपनीला का?

**अजय बुरांडे** | **गायराण धारकांवर होणारा अन्याय**

पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:अंबाजोगाई तालुक्यातील जवळगाव येथील ५० वर्षा पासुन भुमीहिन दलीत कसत असलेली गायराण जमीन ताब्यात घेण्यासाठी शासनानी सुरू केलेली दडपशाही थांबवून त्यांची अतिक्रमणे नियमाकुल करण्यात यावी या प्रमुख मागणीसाठी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने मंगळवार (ता.१५) परळी येथील उपविभागीय अधिकारी कार्यालया समोर निदर्शने करण्यात आली.

राज्यभरातील शेतकऱ्यांच्या ताब्यातील गायराण जमीन खाजगी विज कंपनीला सरकार देत आहे. अंबाजोगाई तालुक्यातील जवळगाव येथील मागील ४० वर्षापेक्षा अधिक काळापासून भुमीहिन दलित शेतकरी कसत असलेली जमिनीची ताबा वहीतिची महसूल दरबारी नोंद असतानाही त्यांची अतिक्रमणे शासन निर्णयाप्रमाणे नियमित करणे आवश्यक असतानाही ती न करता उलट पक्षी शासन पोलीसांमार्फत दडपशाही करुन त्यांना हुसकावून लावण्याच्या प्रयत्न करीत आहेत. राज्यभरातील गायराण जमिनीवर मागील अनेक



वर्षांपासून भूमिहीन दलित, अल्पसंख्यांक शेती वहीती करतात तर काही ठिकाणी राहण्यासाठी वापरतात.अशा या जमिनी खाजगी विज निर्मिती करण्याऱ्या कंपन्यांना सरकार देत आहेत. याविरोधात मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने मंगळवार (ता.१५) परळी उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालया समोर तीव्र निदर्शने करण्यात आली.यावेळी माकप जिल्हा सचिव कॉ.एड.अजय बुरांडे, कॉ.पी एस घाडगे, कॉ.बी जी खाडे, कॉ. पांडुरंग राठोड, कॉ.गंगाधर पोटभरे, कॉ. मुरलीधर नागरगोजे, कॉ.सुदाम शिंदे, कॉ.प्रकाश उजगरे, कॉ.किरण सावजी, कॉ.राधाकिशन जाधव, कॉ. पप्पु देशमुख, कॉ.मनोज देशमुख यांच्या सह कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

जिल्ह्यातील अंबाजोगाई तालुक्यातील जवळगाव येथील भूमिहीन अल्पसंख्याक दलित समाज मागील ४० वर्षांपासून गायरान जमीनी कसून आपली उपजीविका करत आहे.याबाबत ताबा वहीतीची नोंद महसूल विभागात असताना देखील ३१ एक्कर जमिनी पैकी १५ एक्कर जमिनी खाजगी वीज निर्मिती कंपनीला भाडेतत्वावर देत या दलित बांधवाना परत भूमिहीन करण्याचा घाट शासनाने घातला आहे.सरकारच्या या निर्णयाविरोधात मागील ३ महिन्यापासून हे बांधव लढत असून या प्रकरणात चार भूमिहीन दलित शेतकरी बांधवांनी विष प्राशन करून आत्महत्या करण्याच्या प्रयत्न केला. शासनाच्या या अन्यायकारक कृत्याचा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष तीव्र निषेध व्यक्त करत या शासनाच्या निर्णयाविरोधात तीव्र लढा माकप करणार आहे.

## सारणी (आ)येथे हनुमान जयंती

परंपरा: यात्रा महोत्सव उत्साहात संपन्न!



पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:तालुक्यातील सारणी (आ) येथे काल दि १२ एप्रिल रोजी बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या जन्मगावी हनुमान जयंती निमित्त गाडेओडणी व यात्रा महोत्सव खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाला आहे.खर तर सारणी (आ) येथील प्रभु रामचंद्र हनुमान महाराजांनी बीड जिल्ह्या साठी खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या रुपाने बीड जिल्ह्याला खरच बजरंगबली लाभले आहेत अशा भावना नागरिकांन मधुन व्यक्त केल्या जात आहेत तरी या विषयी सविस्तर वृत्त असे मौजे सारणी (आ) येथे प्रतिवर्षाप्रमाणे काल गाडेवडणे व यात्रा महोत्सव संपन्न झाला यावेळी समस्त गावकरी मंडळी तसेच बाहेर गावावरुन आलेल्या पाहुण्यांनी हनुमान जयंती निमित्त असलेल्या यात्रा महोत्सवाचा मनोभावे आनंद घेतला आहे तसेच खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी सुध्दा बीड जिल्ह्याचे खासदार झाल्यानंतर पहिल्यांदाच त्यांच्या जन्मभूमीला नाही विसरता कुठल्याही प्रकारचा गर्व नाही बाळगता मातीशी नाळ घट्ट ठेवत सारणी (आ) येथे हनुमान जयंती निमित्त यात्रा महोत्सवाचा मनोभावे आनंद घेतला आहे.

## लोणारमध्ये कांग्रेसची सहविचार सभा

कार्यक्रम:सभेस उपस्थित राहण्याचे आवाहन

पुण्यभूमी प्रतिनिधी

लोणार:तालुका कांग्रेस व शहर काग्रेस कामीटी च्या वतीने सहविचार सभा आयोजीत केली आहे या सहविचार सभा साठी संस्थाचालक, स्थानिक नेते विविध संघटनांचे पदधिकारी, शिक्षक व सर्व पदविधर मतदारांनी मोठया संख्यांने उपस्थित राहवे असे आहवान राजेश मापारी यांनी केले आहे.

लोणार तालुक्यातील विविध विकास कामांचे भुमिपूजन आणि लोकार्पण सोहळा पदविधर मतदार संघाचे आ. धिरजभाऊ लिंगाडे यांच्या सन २०२४-२५ स्थानिक विकास निधी अंतर्गत लोणार तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेचे भुमिपूजन व लोकार्पण सोहळा तसेच शिक्षक व पदविधर मतदार बांधवां सोबत सहविचार सभेचे



आयोजन केले आहे. याकरीता संस्थाचालक, स्थानिक नेते, विविध संघटनांचे पदाधिकारी, शिक्षक व सर्व पदविधर मतदारांनी उपस्थित रहावे,असे अआहवान लोणार तालुका अध्यक्ष राजेश मापारी, यांनी केले आहे याकार्यक्रमाचे अध्यक्ष वामनराव सांगळे,सत्कारमुर्ती मा. श्री. धिरजभाऊ लिंगाडे आमदार, पदविधर मतदार संघ अमरावती मा. श्री. श्यामभाऊ उमाळकर सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य प्रदेश काँग्रेस कमिटी यांच्या प्रमुख उपस्थितित लोणार तालुक्यातील १) जि.प.शाळा गायखेड शाळाखोली १०.३० वाजता दिनांक १६ एप्रिल २०२५ २) जि.प.शाळा हिरडव कंपाऊंड वॉल ११.०० वाजता वेळ : दुपारी १ वा. ३) जि.प.शाळा वढव कंपाऊंड वॉल ११.३० वाजता केला आहे ४) जिं प. शाळा पिंपळनेर खोली १२: ०० वा. व लोणार येथील कृष्णा लॉज बस स्टॅण्ड समोर, सहविचार सभेचे आयोजन केले आहे या करिता मोठ्यासंख्यांने

## सुशांत खौतडला पोसतोय सभापती?

चर्चा:टाकळीमध्ये भुरट्या गुत्तेदाराने केली घान?

पुण्यभूमी प्रतिनिधी

केज: तालुक्यातील टाकळी जलजिवन काम बोगस केले गुत्तेदारानी जलजिवनच्या कामात बोगस पणा केला आहे टाकळी येथे जलजिवन योजना फक्त नावालाच झाली आहे टाकळी येथे जलजिवनचे निम्मे काम केले आहे सुशांत खवतड नावाच्या गुत्तेदाराने जवळपास टाकळी चे पण ७०% ते ८०% टक्के बील ही उचलले आहे तर तर हे अधिकारी यांच्या निदर्शनास येत नाही का सुशांत खवतड नावाच्या गुत्तेदार जवळपास गेली एक वर्षापासुन गायप आहे हा सुशांत खवतड केज पंचायत समिती सभापतीच्या जवळचा आहे पण टाकळी गाव हे सभापतीचे आहे त्या गावात तरी कमीत कमी बोगस काम करायला लाज तरी वाटली पाहिजे टाकळी येथील जलजिवन योजनेचे काम सभापतींच्या जवळचा गुत्तेदाराचे आहे केज तालुक्यातील अनेक गावांमध्ये या सुशांत खवतड ची कामे आहेत तिथ पण हीच अवस्था आहे या गुत्तेदाराचा केज तालुक्या मध्ये पार बोगस कारभार चालु आहे अनेक गावांमध्ये त्या गुत्तेदारानी जलजिवनच्या कामात कोट्यवधी रुपयांचा निधी हडपला आहे अशा बोगस काम करणाऱ्या गुत्तेदाराला तात्काळ काळ्या यादीत टाकले पाहिजे या गुत्तेदाराने जलजीवन च्या नावाखाली कोठ्याधिश रुपयाचा निधी हडप केला आहे या वर तात्काळ कारवाई झाली पाहिजे टाकळी

## वकील संघाकडून जयंती उत्साहात

नियोजन:डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन



पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगाव:विश्ववंदनीय,परम पूज्य, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, युगप्रवर्तक, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात माजलगाव येथील वकील संघात करण्यात आली. मागील वर्षाप्रमाणे याही वर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती वकील संघातील सन्माननीय सदस्यांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

या जयंती उत्सवाच्या सुरुवातीस डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस व अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून वंदन करण्यात आले. त्यानंतर वकील संघातील सदस्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी व त्यांच्या महान कार्याविषयी आपले मनोगत व्यक्त केले. यामध्ये ॲड. एस.सी. शर्मा साहेब, ॲड. सुजित कांबळे,ॲड. दिपक देशमुख,ॲड. बलराज शिंदे, ॲड. आर. यु. पायाळ यांनी मनोगत व्यक्त केले, तर ॲड. बाबुलाल घनघाव आणि ॲड. उजगरे (जाधव ) मॅडम यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर गीत गायन केले.या जयंती उत्सव कार्यक्रमाचे अध्यक्षीय

## सन्मानाने जगण्याचा अधिकार दिला

सुनिल साळवे:नगरला भीम महोत्सव उत्साहात

पुण्यभूमी प्रतिनिधी

नगर:शहरात महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३४वी जयंती महोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला रिपाइंचे जिल्हाध्यक्ष सुनीलभाऊ साळवे यांच्या हस्ते मार्केट यार्ड चौकातील डॉ आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले

या वेळी जिल्हाध्यक्ष सुनील साळवे मनोगत व्यक्त करताना म्हणाले की महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजातील शोषीत पिडीत वंचितना सन्मानाने जगण्याचा अधिकार दिला आहे युवकांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे अनुकरण करून वाटचाल करावी असे आवाहन केलेअभिवादन कार्यक्रमास जेष्ठ नेते विजय भांबळ प्रबुद्ध भारतचे आप्पासाहेब मकासरे शिवाजी साळवे भाऊसाहेब ठोंबे गणेश कदम आकाश पंचमुख बापु जावळे बंटी गायकवाड कांबळे आदी सह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मार्केट यार्ड येथील महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यासाठी शहरातील रेल्वे स्टेशन कोठी भिंगार आरणगाव येथील युवकांनी रैलीने येऊन अभिवादन केले



## बचत गटाकडून पाचशे रजिस्टरचे वाटप

धोरण:डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीचा उपक्रम



पुण्यभूमी प्रतिनिधी

कळंब: विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर बचत गट हा शिक्षकांचा बचत गट असून सामाजिक बांधिलकी जपत प्रत्येक वर्षी महामानव विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त शाळेतील विद्यार्थ्यांना शिक्षणाची प्रेरणा मिळावी.अभ्यासाची आवड निर्माण व्हावी यासाठी वेगवेगळ्या स्वरूपामध्ये वस्तूंचे वाटप करतात यावर्षी या बचत गटाने त्यांचे सदस्य ज्या शाळेवर कार्यरत आहेत त्या प्रत्येक शाळेतील विद्यार्थ्यांच्या शाळा स्तरावर स्पर्धा घेऊन व वेगवेगळ्या गुणवत्ताधारक स्पर्धेमध्ये यश संपादन केलेले कळंब तालुक्यातील विद्यार्थ्यांना एकूण ५०० रजिस्टरचे पुढील शाळांना वाटप करण्यात आले.जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कन्हेरवाडी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मंगरूळ, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हिंगणगाव, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धानोरा शेळका, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाकडी (इस्थळ), जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ताडगाव, पी.एम.श्री.अटल बिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय विद्यालय शिराढोण, छत्रपती शिवाजी महाविद्यालय कळंब, लता मंगेशकर विद्यालय कळंब, ज्ञानोद्योग विद्यालय येरमाळा, सूर्योदय विद्यालय सोनसांगवी या शाळेतील विद्यार्थ्यांना रजिस्टर वाटप करण्यात आले.

## बावची जलजिवनमध्ये बोगसगिरी!

बोंबला:योजना होऊनही उपयोग नाही

पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:तालुक्यातील बावची गावांमध्ये जलजिवन योजनेत भुरट्या गुत्तेदारांने लाखो रुपयांचा भ्रष्टाचार केला आहे तसेच जलजिवच्या कामात मंजूर करण्यात आले परंतु पाण्याची टाकी नाही जुण्या विहीरीला पाणी असुन सुद्धा गावकऱ्यांनी पाणी मिळत नसल्याचे समजले जाते आहे संपुर्ण गावांनी निवडणूक दिलेल्या सरपंच यांनी जातिने लक्ष दिले पाहिजे परंतु सरपंच जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहेत का राजकारण करत आहेत असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.तसेच गावात पाण्याची टाकी बांधली नाही मग पाण्याच्या टाकीचा निधी हडप कुणी केला आहे असा प्रश्न नागरिकांना पडला आहे तसेच सरपंच यांनी गावचा प्रथम नागरिक



म्हणून गावाला पाणी येते का नाही याची खात्री केली पाहिजे का सरपंच व गुत्तेदार संगनमताने काम करत आहेत त्यामुळे गावाला पाणी पिण्यासाठी नाही असा सुध्दा प्रश्न नागरिकांना पडला आहे त्यामुळे केज तालुक्यातील बावची येथील जलजिवन योजनेचे काम अर्धवट करण्यात आले आहे तरी संमधीत गुत्तेदारावर कार्यवाही करण्यात यावी अशा भावना नागरिकांन मधुन व्यक्त केल्या जात आहेत नागरिकांन मध्ये चर्चा सत्र सुरू झाले आहे.

**कास्ट्राईब** | **झेडपी शिक्षकांच्या पगारासाठी प्रतिनियुक्त करा**

# ज्याचं जळतंय त्यालाच कळतंय!

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:शासन परिपत्रकानुसार कर्मचाऱ्यांचे वेतन दरमहा १ ते ५ तारखे दरम्यान करण्यात यावे असा शासन आदेश असताना सुद्धा प्रत्येक महिन्यात जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या पगारासाठी शिक्षक संघटनाना संघर्ष करावा लागत असून शिक्षक मोठ्या प्रमाणात हवालदिल,निराश व कर्जबाजारी झाल्याचे चित्र दिसत आहे.त्यामुळेच ज्याच जळतंय त्यालाच कळतंय या उक्ती प्रमाणे शिक्षकाच्या पगारासाठी, ज्या प्रमाणे इतर विभागात अशैक्षणिक कामासाठी शिक्षकांना प्रतिनियुक्त करतात त्याचप्रमाणे या कामीसुद्धा त्यांनाच प्रतिनियुक्त करावे अशी मागणी महा.राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाच्या



वतीने प्रसिद्धी पत्रकाद्वारे करण्यात आली आहे.प्रत्येक महिन्यात पगार उशिरा होत असल्याकारणाने शिक्षकांना कौटुंबिक उदार निर्वाहसाठी सावकारी व बँकांकडून कर्जबाजारी व्हावं लागत आहे. आणि तो आर्थिक कंगाल होत आहे.त्याची प्रतिष्ठा पणाला लागत आहे.

त्यातच यावर्षीच नव्हे तर दरवर्षी भारतरत्न,बोधिसत्व,महामानव भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार आधुनिक भारताचे जनक डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त तसेच मुस्लिम बांधवांच्या पवित्र सण रमजान ईद निमित्त पगार वेळेवर होत नाहीत.या सणांना दरवर्षी शिक्षक संघटनांकडून पगार होण्यासाठी संघर्ष करावा लागतो.निवेदने द्यावे लागतात. याला अपवाद म्हणून यावर्षी मात्र जयंती पूर्वी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे पगार अदा करावेत असे शासनाने आदेश दिले असताना सुद्धा जिल्हा प्रशासनाने योग्य ती कारवाई वेळेत न केल्यामुळे शिक्षकांचे पगार होऊ शकले नाहीत.याउपर विविध धार्मिक सणाच्या निमित्त मात्र शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे वेतन महिन्याच्या अगोदरच होतात.हे तरी आनंदाचे आहे.दरवर्षी मार्च एंड व इतर कारणे देऊन

## बावची येथे जोतिबा यात्रा

परंपरा:भाविक-भक्तांची लोटणार गर्दी



पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:तालुक्यातील भालगाव बावची येथे दख्खनचा राजा जोतिबा देवाची यात्रे निमित्त १६ तारखेला बुधवारी ४ वाजता गाडेओढने यात्रे महोत्सवाचा कार्यक्रम आहे तरी पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी मनोभावे आनंद घेण्यासाठी बुधवारी ४ वाजता भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन गावकऱ्यांनी केले आहे तसेच दि.१७ तारखेला पहाटे छबीना